बुधवार, १३ डिसेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १२२
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 13 DECEMBER. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-122 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-05

# हमासचा उदो-उदो करणाऱ्यांवर कारवाई : गृहमंत्री फडणवीस

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर : इस्रायल आणि हमास यांच्यात युद्ध पेटलेले आहे. याचे पडसाद जगभर उमटलेले आहेत. तर, भारतातही इस्रायल आणि पॅलेस्टाईन नागरिकांच्या समर्थनार्थ नागरिकांनी मोर्चे काढले. गेल्या महिन्यांत जळगावात मुस्लीम समाजाची रॅली निघाली होती. ही रॅली अडवून काही समाजकंटकांनी हमास समर्थनार्थ घोषणा दिल्याची माहिती मंगळवारी विधान परिषदेत आमदार प्रसाद लाड यांनी दिली. हमास ही दहशतवादी संघटना आहे. हमासचा कुणी उदो-उदो करीत असेल, तर त्याला भारताचे समर्थन नाही. राज्यात कुठे हमास दहशतवाद्यांना समर्थनाचे प्रकार होत असतील, तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असे म्हणत राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा एकदा हमासविरोधातील भूमिका स्पष्ट केली.**



८ नोव्हेंबर २०२३ रोजी जळगाव जिल्ह्यातील धरणगाव शहरात मुस्लीम समाजाची रॅली निघाली होती. या रॅलीला पोलीस प्रशासनाने परवानगी दिली होती. सर्व पोलीस अधिकारी तिथे उपस्थित होते. असे असतानाही ही रॅली जैन गल्ली बाजारपेठेत आल्यानंतर काही समाजकंटकांनी हमास या दहशतवादी संघटनेच्या समर्थनार्थ घोषणाबाजी केली. हमासचे झेंडेही दाखवले. जळगावसारख्या जिल्ह्यात तांडव केला जातो. तो कुठेतरी थांबला पाहिजे आणि पीआय उद्धव धमाळ यांच्यावर उच्चस्तरीय कारवाई करावी, अशी मागणी आमदार प्रसाद लाड यांनी केली. प्रसाद लाड यांच्या मागणीवर उत्तर देताना गृहमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, गाझापट्टीत जे काही झाले त्यासंदर्भात भारताची भूमिका स्पष्ट आहे. इस्रायलवर हमासने केलेला हल्ला चुकीचा आहे, असे आपले मत आहे. त्याचवेळी आपण सातत्याने पॅलेस्टाईनच्याही बाजूने उभे राहिलो आहोत. आपण पॅलेस्टाईनच्या बाजूने असलो तरी हमासच्या बाजूने नाही. त्यामुळे हमास ही दहशतवादी संघटना म्हणून घोषित झाली आहे. कोणी पॅलेस्टाईनचा उदो उदो करत असेल तर ते आपल्या भूमिकेशी सुसंगत आहे. परंतु, कोणी हमासचं उदो उदो करत असेल तर ते भारताला मान्य नाही. दहशतवादी संघटनेला आपलं कोणतंही समर्थन नाही. जे प्रसाद लाड यांनी काही मांडलेलं आहे ते तपासलं जाईल. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी राष्ट्रीय तपास यंत्रणेने (NIA) आज (दि. ९ डिसेंबर) धाडसत्र राबवून महाराष्ट्र आणि कर्नाटकातील ४४ ठिकाणी छापेमारी केली. याप्रकरणी प्रसाद लाड यांनी विधान परिषदेत मुद्दा मांडून राज्य सरकारच्या गृहखात्याने केलेल्या या कामगिरीबाबत गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा अभिनंदनाचा प्रस्ताव मांडण्याची मागणी केली.

# जुन्या पेन्शन योजनेचा निर्णय विधानसभा निवडणुकीपूर्वी

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विधानपरिषदेत आश्वासन

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** जुन्या पेन्शन योजनेसंदर्भात राज्यसरकारने तीन सदस्यांची समिती स्थापन केली होती, समितीने आपला अहवाल राज्य सादर केला आहे. जुन्या पेन्शनसंदर्भात राज्य शासन सकारात्मक असून येत्या विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी याबाबत निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी आज विधानपरिषदेत दिले.




विधान परिषदेत नियम १०१ अन्वये, जुन्या पेन्शनसंदर्भात विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित मुद्यावर सरकारतर्फे माहिती देताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जुन्या पेन्शन योजनेसंदर्भात केंद्रसरकारस्तरावर सुध्दा वेगळा विचार सुरु आहे. कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या वेतन, महागाई भत्ता यासंदर्भात केंद्रसरकारने वाढ केल्यानंतर राज्यसरकार सुध्दा त्याच पध्दतीने वाढ करत असते. जुन्या पेन्शन योजनेसंदर्भात केंद्रसरकारने निर्णय घेतल्यास त्याच धर्तीवर राज्यात सुध्दा निर्णय घेण्यात येईल. जुन्या पेन्शन योजनेसंदर्भात सुबोधकुमार, के. पी. बक्षी आणि सुधीर श्रीवास्तव या तिघांची समिती स्थापन केल्यानंतर त्या समितीने आपला अहवाल राज्यसरकारला सादर केला आहे. त्याचबरोबर देशातील ज्या राज्यात जुन्या पेन्शन योजनेबाबत निर्णय घेण्यात आला आहे, त्याची माहितीही मागविण्यात आली आहे. ती माहिती आल्यानंतर त्याबाबतचा अभ्यास करण्यात येईल. जुन्या पेन्शन योजनेबाबत राज्यसरकार सकारात्मक असून येत्या विधानसभा निवडणुकीपूर्वी याबाबतचा निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन सभागृहात दिले.

# शेतकऱ्यांनी फक्त फाशीच घ्यायची का?

आधुनिक केसरी न्यूज



**नागपूर :** केंद्र सरकारने ऑस्ट्रेलियाच्या शेतकऱ्यांकडून कापूस विकत घेतला आणि इथे आणला. त्यामुळे आपल्या शेतकऱ्यांना आधीचा भाव मिळेनासा झाला. ऑस्ट्रेलियाच्या शेतकऱ्यांना केंद्राने पैसा दिला, त्यातून तो बिअर आणि वाईन पिऊ शकतो. आपल्या शेतकऱ्यांनी फक्त फाशीच घ्यायची का? असा सवाल रोहित पवार यांनी केंद्र सरकारला केला आहे. महाराष्ट्रात अशीच परिस्थिती असेल तर शेतकऱ्यांसाठी आपल्याला लढावेच लागणार आहे, असेही रोहित पवार म्हणाले.

आजच्या घडीला राज्यातला शेतकरी हवालदिल झाला आहे. बेरोजगारीचे प्रश्न आहेत. अधिवेशनात या प्रश्नांवर चर्चा झाली पाहिजे. मात्र ती होतना दिसत नाही, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी म्हटले आहे. रोहित पवार यांची युवा संघर्ष यात्रा नागपूरमध्ये पोहचली. त्यावेळी त्यांच्या संघर्ष यात्रेत शरद पवार, संजय राऊत, अनिल देशमुख, दिग्विजय सिंह या महाविकास आघाडीच्या नेत्यांचाही सहभाग होता.
काही दिवसांपूर्वी विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारताला ऑस्ट्रेलियाने हरवले. आपली टीम चांगली खेळत होती. दुर्दैवाने आपण हरलो. पण काही महिन्यांपूर्वी असाच ऑस्ट्रेलियाचा शेतकरी जिंकला आणि महाराष्ट्राचा, या देशाचा शेतकरी हरला. तो कसा? जेव्हा या भागात कापसाला ९ ते १० हजारांचा भाव मिळत होता.

# पाणीपुरवठा करणाऱ्या पाइपलाइनला गळती

## वाशी शहरासह अनेक भागांतील लोकांच्या घशाला कोरड


आधुनिक केसरी न्यूज


**सचिन कोरडे**

**धाराशिव :** जिल्ह्याला अगोदरच पर्जन्यमान कमी त्यात अनेक गावांना पाणीपुरवठा करणारे तळे व धरणांनी तळ गाठलेला आहे. शासनाकडून जिल्ह्यातील दुष्काळाची गंभीर दखल घेत लवकरच केंद्र सरकारकडून जिल्ह्यातील दुष्काळी भागाचा आढावा घेतला जाणार आहे. दुष्काळाची गंभीर परिस्थिती असताना देखील वाशी नगरपंचायत पाणी वापराच्या काटकसरी बाबतीत अनभीज्ञ आहे. असेच चित्र दिसतं आहे,पाणीटंचाईमुळे सद्या वाशी शहरातील विविध भागात चार ते पाच किंवा आठ दिवसानंतर पाणी पुरवठा केला जात आहे. त्यातच शहराला पाणी पुरवणाऱ्या वंजारवाडी पाणी पुरवठा योजनेच्या वाहिनीला लागणारी वारंवार गळती ही अतिशय गंभीर बाब आहे. विशेष म्हणजे गेल्या चार वर्षांपूर्वीच ह्या वाशी शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईन चे काम केले आहे. तरीही अशा नवीन पाईपलाईन ला जर भर दिवसाच गळती लागत असेल तर पाणीपुरवठा करणाऱ्या या पाईप लाईनच्या कामाबद्दल राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून या कामात जाणीवपूर्वक हलगर्जीपणा केला आहे की, पाणीपुरवठा करणाऱ्या या पाणी पुरवठा योजनेचे कामच केलेले नाही, अशी चर्चा सध्या वाशी शहरातील दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या नागरिकांकडून होत आहे.











विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

या कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन ज्यांच्या कल्पनेतून साकारले आणि ज्यांनी प्रचंड मेहनत ज्यांनी घेतली ते प्रा. डॉ. श्रीकांत तारे, बऱ्हाणपूर येथील पूर्णिमाताई हुंडीवाले प्रत्येक सदस्याकडे आवर्जून लक्ष देत होते. त्यांना प्रा. संजय दहाड, ॲड सुशील अत्रे आदींची सक्रिय साथ होती. जळगावचे नाट्यकर्मी शंभू पाटील होते. प्रा. संजय बारी यांचे बहारदार सुत्रसंचलन, जळगावच्या भगिनी वर्गाने आपल्या नृत्यगीतांतून साकारलेला माय मराठीचा जागर सर्वांना आनंदित करून गेला. प्रकाशक आणि लेखक यांना येणाऱ्या समस्यांवर एक मनमोकळे चर्चासत्र झाले. अतिशय बहारदार असे काव्यसंमेलन झाले. अरुण म्हात्रे यांनी मार्मिक काव्यपंक्तींनी केलेले सुत्रसंचलन सगळ्यांनाच सुखावत होते. कवितांचे विविध प्रकार सादर झाले. काव्यातील रस, रंग, गंध श्रोत्यांपर्यंत यशस्वी पोहोचत होता. मला काही आवश्यक कारणामुळे लवकर निघून जावे लागल्यामुळे संध्याकाळी अशोकजी नायगावकर आणि अरुणजी म्हात्रे यांच्या काव्याच्या जुगलबंदीचा आनंद आणि दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमांचा आनंद घेता आला नाही. पण उपस्थितांनी त्याचा जो वृत्तांत नंतर शब्दबद्ध केला, त्यावरून काहीतरी चांगल्या गोष्टींना आपण मुकल्याची जाणीव झाली. पण या कार्यक्रमाच्या निमित्ताने मात्र खूप जिवाभावाची माणसे भेटली. मागे बऱ्हाणपूरला मी एका व्याख्यानानिमित्त गेलो होतो. तेथील मराठी प्रेमी मंडळींनी त्या प्रांतातही माय मराठीचे जतन, संवर्धन करण्याचे व्रत घेतले आहे. तिथे ज्या मंडळींचा परिचय झाला होता, त्यातील काही मंडळी जळगावच्या या साहित्य संमेलनासाठी आली होती. पूर्णिमाताई हुंडीवाले, उज्ज्वलाताई कापडिया, विद्याताई श्रॉफ या भेटल्या. ज्यांच्या कविता नेहमी वाचत असतो अशा गीताताई गद्रे, कांचनताई संगीत यांची भेट झाली. मूळ चाळीसगावच्या पण सध्या पुण्यात वास्तव्यात असलेल्या अनिताताई देशमुख भेटल्या. या ग्रुपवर अनेक मान्यवर आणि दिग्गज साहित्यिक, कवी आहेत.



## आनंदी पहाट

## कार्यक्षम आंतरवैयक्तिक संबंधांची गुणवत्ता

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

कौटुंबिक सुदृढ परस्पर संबंधांसाठी सहानुभूती ही एक महत्त्वाची गुणवत्ता आहे. आपल्याला आपल्या सभोवतालच्या लोकांचे दुःख आणि वेदना जाणून घेणे आणि समजून घेणे आवश्यक आहे. अनेकवेळा, लोक फक्त त्यांच्या समस्यांबद्दल चिंतित असतात. तथापि, कुटुंबात, आपण आपल्या सभोवतालच्या प्रत्येकासाठी दयाळू असणे आवश्यक आहे. कार्यक्षम आंतरवैयक्तिक संबंधांसाठी आपल्याकडे असलेली दुसरी गुणवत्ता म्हणजे स्वीकृती होय. आपल्या आजूबाजूच्या लोकांना आपण स्वीकारले तर उत्तमच आहे. काहीवेळा आपल्याला समोरची व्यक्ती आवडणार नाही, पण आपण त्यांना ती व्यक्ती जशी आहे तशी स्वीकारायला शिकले पाहिजे. नेहमी इतरांनी आपल्यासाठी बदलण्याची अपेक्षा केल्याने आपल्याला कधीही आनंद होणार नाही. इतर सदस्यांना स्वीकारणे आणि समाधानी राहणे चांगले असल्याचे समजून घेतले पाहिजे. कुटुंब अनेक व्यक्तींनी बनलेले असते. कुटुंबातील सर्व सदस्य आपल्याला मान्य असण्याची गरज नाही. तथापि, आपण त्यांना स्वीकारले पाहिजे. प्रत्येक व्यक्ती दुसऱ्यापेक्षा वेगळी असते; आपण आपल्या कुटुंबासह बदलायला शिकले पाहिजे. कुटुंब म्हणजे एक दैवी बंधन आहे. अप्रामाणिकपणा किंवा विश्वासघात नातेसंबंध खराब करते. कुटुंबात लोक रक्ताने बांधलेले असतात. कुटुंबातील सदस्य भावनिकरित्या जोडलेले असतात आणि जेव्हा आवश्यक असेल, तेव्हा मदत करण्यास तयार असतात. कुटुंबातील सदस्यांशी प्रामाणिक राहणे महत्त्वाचे आहे. प्रामाणिकपणा नातेसंबंध टिकण्यास मदत करतो. जेव्हा आपण इतर सदस्यांसह कुटुंबात राहतो, तेव्हा आपल्याला त्यांच्याशी निरोगी संबंध निर्माण करणे आवश्यक आहे. आपण नेहमी आपल्या निर्णयावर हट्टी राहू शकत नाही. कुटुंबासोबत राहणे म्हणजे अधिक सहनशील असणे. काहीवेळा आपल्याला अशा गोष्टी कराव्या लागतील,ज्यामध्ये आपले कुटुंब आनंदी राहील, जरी ते आपल्याला आनंद देत नसले तरीही. आव्हानात्मक परिस्थितीत संयम ठेवल्याने आपल्याला कोणत्याही गोष्टीपेक्षा जास्त फायदा होऊ शकतो.



आधुनिक केसरी

## स्थितप्रज्ञ व्हावा | अनुभव ||

करूनी प्रपंच | सात्विक वृत्तीने ||
साधावा नित्त्याने | परमार्थ ||१||
सकलांचे हीत | चिंती क्षणोक्षणी ||
संत चिंतामणी | तेच जाण ||२||
सज्जनांचे ढोंग | घेऊनी जगती ||
त्यांची खलवृत्ती | विनाशक ||३||
आप पर भाव | जळोनिया जावा ||
बालक मी व्हावा | दारी तुझ्या ||४||
संसार परमार्थ | करूनी सांगावा ||
स्थितप्रज्ञ व्हावा | अनुभव ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरुपण

आधुनिक केसरी

पापसामग्री सरली ।देवसेंदिवस वेथा हरली ।
वैद्यें औषधें दिधलीं ।उपचार जाला ॥२८॥
मरत मरत वांचला ।यास पुन्हां जन्म जाला ।
लोक म्हणती पडिला ।माणसांमध्यें ॥२९॥
येरें स्त्री आणिली ।बरवी घरवात मांडिली ।
अति स्वार्थबुद्धी धरिली ।पुन्हां मागुती ॥३०॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

साधन सेवा प्रथम है, सेवाहीन न ज्ञान ।
भक्ति मुक्ति पावे नहीं, गुण स्वभाव सत ज्ञान ।।१२।।(स्वर्वेद पंचम मण्डल पंचम अध्याय) ०५/०५/१२
साधन सेवा प्रथम है, मानव से बन देव ।
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
भक्तीचे प्रथम साधन सेवा आहे. सेवाहीन मनुष्यास ज्ञान प्राप्त होत नाही. ना भक्ती-मुक्ती प्राप्त होते, ना उत्तम गुण, स्वभाव आणि सत्यज्ञान प्राप्त होते.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

..........................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## रामदास स्वामी

आधुनिक केसरी

आक्का व उद्धव यांखेरीज बाकीचे सगळे बाहेर दाराशीच बसले,




आणि समर्थांनी रघुपतीकडे दृष्टी लावून ध्यान धरले; त्याबरोबर आक्का व शिष्य मंडळी घाबरी होऊ लागली. ते पाहून समर्थ म्हणाले ,'इतके दिवस सेवेत राहून वेदान्त श्रवण केल्याचे व अध्यात्माच्या अभ्यासाचे फळ हेच काय? त्यावर आक्कांनी हात जोडून विनंती केली, घाबरे होणे किंवा ममतेत गुंतणे हे काहीच समर्थांनी ठेवले नाही, पण प्रत्यक्ष सेवा व सगुणदर्शन अंतरेल याचे वाईट वाटते'; त्या वेळी त्यांच्या (व आज आपल्याही) समाधानासाठी समर्थांच्या मुखातून पुढील अभंग प्रकटला आक्का व उद्धव यांखेरीज बाकीचे सगळे बाहेर दाराशीच बसले, आणि समर्थांनी रघुपतीकडे दृष्टी लावून ध्यान धरले; त्याबरोबर आक्का व शिष्य मंडळी घाबरी होऊ लागली. ते पाहून समर्थ म्हणाले ,'इतके दिवस सेवेत राहून वेदान्त श्रवण केल्याचे व अध्यात्माच्या अभ्यासाचे

## नाम-रूपाचा संबंध !

आधुनिक केसरी

नाम घेत असताना रूपाचे ध्यान आवश्यक आहे का ? वास्तविक, नाम आणि रूप ही भिन्न नाहीतच. पण नाम हे रूपाच्या आधीही असते आणि नंतरही उरते. नाम रूपाला व्यापून असते. राम जन्माला येण्यापूर्वी वाल्मीकींनी रामायण लिहिले, आणि रामाने मागाहून जन्म घेऊन त्यात वर्णन केल्याप्रमाणे आचरण करून दाखविले. म्हणजे रूप अस्तित्वात येण्यापूर्वी नाम होते, आणि रूप गेल्यानंतर आजही नाम शिल्लक आहे. देशकालाच्या पलीकडे जे कायम टिकते ते सत्य होय. प्रत्यक्ष आकाराला आलेली अनेक रूपे नाहीशी झाली तरी त्यांचे नाव टिकून राहते. म्हणजे नाम हे देशकालाच्या मर्यादेच्या पलीकडे असते; म्हणजे ते रूपापेक्षा जास्त सत्य असते. जे सत्य आहे ते श्रेष्ठ असलेच पाहिजे. तेव्हा नाम घेणे ही गोष्ट मुख्य आहे. ते घेत असताना रूपाचेही ध्यान राहिले तर उत्तमच; पण ते तसे न राहिले, तरी नाम घेत असताना रूपाचे स्मरण सूक्ष्मरूपाने असतेच असते. समजा, एका गृहस्थाच्या घरी राम नावाचा गडी आहे. तो गृहस्थ ' राम राम ' असा



जप करीत बसला आहे, पण त्याचे लक्ष राम-रूपाकडे नाही, मनात काहीतरी दुसरेच विचार चालू आहेत. अशा वेळी त्याला जर एकदम विचारले की, ' तुम्ही कुणाचे नाव घेत आहात ? ' तर अर्थात् 'रामाचे', असेच उत्तर तो देईल. हे उत्तर देताना त्याच्या मनात ' दाशरथी राम ' हीच व्यक्ती असणार, ' राम गडी ' ही व्यक्ती नसणार. याचाच अर्थ असा की, नाम घेत असताना रूपाचे ध्यान सूक्ष्मरूपाने आत जागृत असते. म्हणूनच, रूप ध्यानी येत नाही म्हणून अडून बसू नये. नामस्मरण करण्याचा अट्टाहास ठेवावा, त्यात सर्व काही येते. एखाद्या माणसाची आणि आपली ओळख असेल तर पहिल्याने त्याचे रूप पुढे येते आणि नंतर नाम येते. पण आपली त्याची ओळख नसेल, आणि आपण त्याला बघितलेला नसेल, तर त्याचे फक्त नाव येते. आज आपल्याला भगवंताची ओळख नाही, म्हणून त्याचे रूप माहिती नाही; परंतु आपल्याला त्याचे नाम घेता येईल. सध्यासुद्धा, त्याचे नाम घेताना त्याची आठवण आपल्याला होते हा आपला अनुभव आहेच. भगवंताचे रूप तरी निश्चीत कुठे आहे ? एक राम ' काळा ' तर एक राम ' गोरा ' असतो; एक राम 'लहान' तर एक ' मोठा ' असतो; पण सर्व रूपे एका रामाचीच असतात. भगवंत स्वतः अरूप आहे; म्हणून जे रूप आपण त्याला द्यावे तेच त्याचे रूप असते. यासाठी आपण कोणत्याही रूपामध्ये त्याचे ध्यान केले तरी चालते. नामातून अनंत रूपे उत्पन्न होतात आणि अखेर त्यामध्येच ती लीन होतात. म्हणून भगवंताचे नाम श्रेष्ठ आहे. हे त्याचे नाम तुम्ही आवडीने, अखंड घ्या आणि आनंदात रहा.
६. दानात दान अन्नदान, उपासनेत उपासना सगुणाची उपासना, आणि साधनात साधन नामस्मरण.

## गुणरूप

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

समोरचे ज्ञान दिसत असो अगर न दिसो त्याची जाणीव होण फार गरजचे असते. म्हणजेच यांचा अर्थ आत्मा हा सगळ्याचं जीवांचा अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यांचा प्रत्येक जीवाने आदर करावा,हे पूर्ण सत्य आहे. जाणीव सगळीकडे व्यापून आहे ती पिंडामध्ये आढळते तिचं ब्रम्हांडामध्ये आढळते म्हणून आत्मज्ञान झाले की ब्रम्हज्ञान सहज मिळते. आत्मज्ञान होण्यासाठी जाणिवेशी अनन्य व्हावे लागते. आपली वासना यामध्ये आड येते. व आपण आत्मज्ञानी झालो की देहाशी समरस होतो. आपण देहाइतके आकुंचित बनतो. देहाभोवती गुंतलेले आपण आपल्या देहाशी समरस होतो.

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, १३ डिसेंबर २०२३





देवदिवाळी : इतिहास, संस्कृती आणि शेतीचे धागे विणणारा सण पान ६





तुझे जीवन की डोर से बांध लिया है... पान ७




# काँग्रेस खासदाराचा निषेध; भाजप महिला मोर्चा आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** काँग्रेसचे राज्यसभेचे खासदार धीरज साहू यांच्याकडे बेहिशेबी ३०० कोटी रुपया पेक्षा अधिक मालमत्ता सापडली असून काँग्रेसच्या या भ्रष्टाचाराचा निषेध म्हणून भाजप रिसोड मालेगाव विधानसभा वतीने भाजपा निवडणूक प्रमुख अॅड नकुल देशमुख यांच्या उपस्थितीत निषेध आंदोलन रिसोड येथे करण्यात आले.

ओडिशातील काँग्रेसचे खासदार धीरज साहू यांच्याकडे बेहिशोबी काळे धन सापडले आहे. आत्तापर्यंत प्राप्तीकर विभागाने तीनशे पन्नास कोटींहून जास्त रोख रक्कम मोजली आहे.अजूनही मोजणी सुरूच आहे. काँग्रेसच्या या भ्रष्टाचाराच्या शृंखलेविरोधात भाजपा रिसोड मालेगाव विधानसभा निवडणूक प्रमुख अॅड नकुल दादा देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत निषेध आंदोलन करण्यात आले. यामध्ये रिसोड शहरात निषेध रॅली काढण्यात आली. भाजप नेते नकुल दादा देशमुख यांच्या जनसंपर्क कार्यालयापासून सुरू झालेले ही रॅली लोणी फाट्यावरून भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक या दरम्यान रॅली काढण्यात आली. प्रसंगी धीरज साहू व काँग्रेस यांच्या विरोधात घोषणाबाजी केल्या गेली. नंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे खासदार धिरज साहू याचा पुतळा दहन करून व काँग्रेस पक्षाचा व साहू यांना पाठीशी घालणाऱ्या राहुल गांधी व सोनिया गांधी यांचा जाहीर निषेध करण्यात आला. यावेळी निषेध आंदोलनात बोलताना भाजप रिसोड मालेगाव विधानसभा निवडणुक प्रमुख अॅड नकुल देशमुख म्हणाले की, ६ डिसेंबर २०२३ रोजी आयकर विभागाने मद्य निर्मिती कंपनी बलदेव साहू आणि समूहाच्या झारखंड आणि ओडिशामधील 10 ठिकाणी छापे टाकले. आयकर विभागाने बोलंगीर कार्यालयापासून ३० किमी अंतरावर असलेल्या बलदेव साहू कंपनीच्या सातपुडा कार्यालयावर छापा टाकून ३०० कोटी रुपयांची रोकड जप्त केली आहे.

काँग्रेसचे राज्यसभा खासदार धीरज साहू ( वय- 64, ओबीसी- सुंडी) आणि मद्यनिर्मिती कंपनी बलदेव साहू आणि समूहाशी संबंधित उद्योगपती यांच्या निवासस्थानावर आयकर विभागाने छापा टाकला आहे. आयकर विभागाची ही कारवाई सुमारे ३ दिवस बुधवारी सुंदरगढ शहरातील सरगीपाली येथील काही घरे, कार्यालये आणि डिस्टिलरीवर इथे सुरु होती. त्यातून ही रोकड विभागाने जमा केली आहे. त्यातून इतकी जास्त रक्कम आयकर विभागाच्या हाती लागली की त्यांना मुद्दाम नोटा मोजणारी मशिन्स मागवून घ्यावी लागली आणि १५७ मोठ्या बॅगांमधून ही रक्कम आयकर विभागाला न्यावी लागली.अनेक बेकायशीर व्यवसाय असलेले धीरज प्रसाद साहू काँग्रेसचे राज्यसभेचे ३ वेळचे खासदार राहिलेले आहेत. शिवाय त्यांचा दारू विक्री आणि गाळण्याचा सुद्धा व्यवसाय आहे. जिथे जिथे काँग्रेसची सरकारं असतात तिथे तिथे असे नेते काँग्रेस सरकारच्या माध्यमातून राज्याची, जनतेची लूट करतात.

काँग्रेस सरकारच्या भ्रष्टाचाराला आणि मनमानी कारभाराला कंटाळून जनतेने भाजप सरकारला निवडून दिलं. आता झारखंड मधील या २०० कोटीच्या प्रकरणांमुळे काँग्रेसच्या खासदाराचे बिंग फुटले आहे. बेकायदेशील व्यवसायांमधून अमाप संपत्ती कमावणाऱ्या व्यक्तीला काँग्रेसने राज्यसभेची खासदारी का दिलेली असेल, याचा विचार भारताच्या जनतेने करावा, असेही देशमुख यांनी नमूद केले. यावेळी भारतीय जनता पक्षाचे जिल्हा महिला पदाधिकारी, भाजप जिल्हा, विधानसभा, तालुका पदाधिकारी, सर्व मोर्चा, आघाडी, प्रकोष्ट अध्यक्ष, संयोजक, सहसंयोजक, भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




लोकनेते गोपीनाथ मुंडे यांना जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यालयात मंगळवारी अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रदेश मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, प्रदेश कार्यालय सचिव मुकुंद कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# उरण ते शिर्डी पदयात्रेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** उरण तालुक्यात असून याच साई भक्तांच्या वतीने साईबाबांचे नामस्मरण, भजन करत दरवर्षी उरण ते शिर्डी असे पायी पदयात्रेचे आयोजन केले जाते. उरण तालुक्यातील श्री साई बाबांची मानाची पहिली पालखी श्री साई सेवा मंडळ( रजि.) उरण तालुका व देणगीदार, जनतेच्या वतीने काढण्यात आली असून गेली २२ वर्षे ही पदयात्रा निरंतर, श्रद्धामय, धार्मिक वातावरणाने शिस्तमय पद्धतीने आजही चालूच आहे. यंदा पदयात्रेचे हे २३ वे वर्ष आहे. यंदा श्री साई सेवा मंडळ उरण तालुका, देणगीदार, जनता यांच्या वतीने भव्य पालखी, वारकरी दिंडी पदयात्रा श्री दत्त मंदिर, देऊळवाडी (उरण शहर) येथून रविवार दि १७/१२/२०२३ रोजी सकाळी ७ वाजता श्री ची आरती करून श्री क्षेत्र शिर्डीकडे प्रस्थान होणार आहे. तब्बल २६१ किलामीटरचा पायी प्रवास( पदयात्रा) करून पालखी दत्त जयंतीच्या एक दिवस अगोदर म्हणजेच सोमवार दि २५/१२/२०२३ रोजी सकाळी १० वा. श्री क्षेत्र पुण्यधाम शिर्डी येथे पोहोचनार आहे. पालखी दिंडीच्या सांगता प्रित्यर्थ श्री साई भंडारा व श्री सत्य नारायणाची महापूजा शनिवार दि ०६ जानेवारी २०२४ रोजी श्री रत्नेश्वरी मंदिर, जसखार, उरण येथे संपन्न होणार आहे. रविवार दि १७/१२/२०२३ रोजी सकाळी ७ वा श्री ची पालखी व पादुका साई भक्तांच्या दर्शनासाठी श्री दत्त मंदिर देऊळवाडी येथे ठेवण्यात येणार असून साई भक्तांनी या श्री च्या पालखी व पादुकांच्या दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री साई सेवा मंडळ उरण विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# धर्माबादेत ५१ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**धर्माबाद :** पंचायत समिती, गटसाधन केंद्र धर्माबाद यांच्या वतीने शहरातील जिजामाता कन्या शाळेत ५१ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन दि.११ डिसेंबर रोजी पार पडले. यात शहरी व ग्रामीण भागातील शाळांनी विज्ञान प्रदर्शनात सहभाग नोंदविला होता.

या विज्ञान प्रदर्शनाचे उदघाटक म्हणून जिजामाता शाळेचे अध्यक्ष संजय पाटील शेळगावकर, तर प्रमुख पाहूणे म्हणून तहसीलदार शंकर हंदेश्वर, गटशिक्षणाधिकारी रविशंकर मरकंटे,विस्तार अधिकारी प्रतापराव पावडे, केंद्रप्रमुख आबासाहेब उस्केलवार, एस.बी.कदम, पत्रकार कुणाल पवारे आदीजण यावेळी उपस्थित होते.तालुक्यातील अनेक शाळांनी विविध विषयांवर आधारित प्रयोगाचे सादरीकरण केले. प्राथमिक गटातुन यशवंत विद्यालय धर्माबाद (आरोग्य मानवी शरीर व रचना)



द्वितीय क्रमांक.इंदिरा गांधी इंग्लिश स्कूल धर्माबाद( नैसर्गिक संसाधने उर्जा तृतीय क्रमांक हुतात्मा पानसरे हायस्कूल धर्माबाद (शेती-कचऱ्याचे व्यवस्थापन )माध्यमिक गटातून प्रथम -गौतमी हायस्कूल करखेली( आरोग्य स्वच्छता) द्वितीय हुतात्मा पानसरे हायस्कूल धर्माबाद( फायर अलर्ट यंत्र)तृतीय क्रमांक जि.प. हायस्कूल करखेली( धुम्रपानाचे दुष्परीणाम) या शाळेने पटकावला आहे. प्रयोगांचे निरीक्षण प्रा.अरविंद बोधनकर, प्रा. शिंदे, प्रा.गर्दसवार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाघमारे सर यांनी केले.

# रिसनगाव येथे संत बाळूमामा कलशारोहण सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** तालुक्यातील रिसनगाव येथे श्री संत बाळूमामा कलशारोहण सोहळ्यानिमित्त मंगळवार पासून अखंड हरिनाम सप्ताह तथा श्री तुलशी रामायण कथा व ज्ञानयज्ञ सोहळा आयोजित करण्यात आला असून दि. १२ पासून दि. १८ डिसेंबर पर्यंत दैनंदिन रामायण कथाकार रामायणाचार्य हभप रामराव महाराज ढोक यांच्या रसाळ वाणीतून तुळशी रामायण कथा कथन केली जाणार आहे. तर २१ पर्यंत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली.

श्री संत बाळूमामा कलशारोहण सोहळ्यानिमित्त लोहा तालुक्यातील रिसनगाव येथे दि. १२ पासून दि. २१ डिसेंबर पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून दि.



१२ रोजी मंगळवारी पासून दैनंदिन सकाळी ४ ते ६ काकडा भजन, ७ वाजता श्रींची आरती, ७ ते ९ ज्ञानेश्वरी पारायण, ९ ते ११ गाथा भजन, दुपारी १ ते ४ दरम्यान हभप रामराव महाराज ढोक यांचे श्री तुलशी रामायण कथा तसेच दि. १२ रोजी रात्री ९ ते ११ दरम्यान हभप पांडूरंग महाराज उगले शास्त्री यांचे हरी कीर्तन, दि. १३ रोजी रात्री हभप सुदाम महाराज पानेगावकर यांचे हरी कीर्तन, दि. १४ रोजी हभप विलास महाराज गेजगे, दि. १५ रोजी हभप अक्रूर महाराज साखरे, दि. १६ रोजी हभप प्रकाश महाराज साठे, दि. १७ रोजी हभप चैतन्य महाराज राऊत, दि. १८ रोजी हभप विशाल महाराज खोले, दि. १९ रोजी हभप माऊली महाराज पठाडे, दि. २० रोजी हभप अच्युत महाराज दस्तापुरकर, दि. २० रोजी हभप पुरुषोत्तम महाराज पाटील, यांचे हरी कीर्तन तर दि. २१ रोजी हभप समाधान महाराज भोजेकर यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. दि. २१ रोजी दुपारी १ ते ६ वाजता भव्य यात्रा मोहत्सव, नगर प्रदक्षिणा व पालखी सोहळा त्यानंतर श्री संत बाळूमामा मंदिर कलशारोहण व गुरुपुजन सोहळा होणार आहे. सदरील सोहळ्यात मृदंगाचार्य, गायनाचार्य यांचा सहभाग असणार आहे. सदरील उत्सव सोहळ्यात पंचक्रोशीतील बहुसंख्य भाविकांनी सहभागी व्हावे असे आवाहन सकल रिसनगाव ग्रामस्थांनी केले आहे.

## पाकिस्तानची नाराजी


आधुनिक केसरी

जम्मू आणि काश्मीरला दिलेला विशेष राज्याचा दर्जा संसदेने २०१९ साली काढून टाकला होता. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत ही घोषणा करताना संविधानाचे अनुच्छेद ३७० आणि ३५ अ रद्दबातल ठरविले होते. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात विविध याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. त्यावर निर्णय देत असताना सोमवारी (११ डिसेंबर) संसदेचा निर्णय योग्य असल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला. पाकिस्तानचे अंतरिम परराष्ट्रमंत्री जलील अब्बास जिलानी यांनी इस्लामाबाद येथे पत्रकार परिषद घऊन या निर्णयाचा विरोध करताना म्हटले की, जम्मू आणि काश्मीरवर भारतीय संविधानाचे वर्चस्व मान्य केले जाणार नाही. जलील अब्बास जीलानी पुढे म्हणाले की, जम्मू आणि काश्मीरचा विषय आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता प्राप्त विवाद आहे. सात दशकांहून अधिक काळ संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेच्या अजेंड्यावर हा विषय राहिला आहे. काश्मिरी लोक आणि पाकिस्तानच्या इच्छेविरुद्ध भारताला या विवादित क्षेत्राबाबत एकतर्फी निर्णय घेण्याचा कोणताही अधिकार नाही. जम्मू आणि काश्मीरमध्ये भारतीय संविधानाचे वर्चस्व चालणार नाही, असे सांगताना जलील अब्बास जीलानी म्हणाले, "पाकिस्तानमध्ये भारतीय संविधानाच्या अखत्यारित येत असलेल्या कोणत्याही प्रक्रियेचे कायदेशीर महत्त्व नाही.

भारत त्यांचे कायदे आणि न्यायालयीन निर्णयाच्या आधारावर आंतरराष्ट्रीय जबाबदारीतून मागे हटू शकत नाही. जम्मू आणि काश्मीरला पाकिस्तानपासून वेगळे करण्याची भारताची प्रत्येक योजना अपयशी ठरेल.

दैनिक जागरणने दिलेल्या बातमीनुसार जिलानी यांना पाकिस्तानी पत्रकारांनी एलओसीवर यापुढेही शांतता कायम राहिला का? असा प्रश्न विचारला होता. यावर जिलानी म्हणाले की, मागच्या दोन-तीन वर्षांपासून एलओसीवर शांतता कायम ठेवण्यात यश आले होते. यापुढेही असेच वातावरण राहावे, असे आम्हाला वाटते. तसेच काश्मीरच्या प्रश्नावर भविष्यातील धोरण ठरविण्यासाठी संबंधितांची बैठक बोलाविण्यात येईल आणि बैठकीत पुढची रणनीती ठरविण्यात येणार असल्याचे ते म्हणाले. तसेच संयुक्त राष्ट्राने सुरक्षा परिषदेच्या प्रस्तावाची अंमलबजावणी करावी, ज्यामध्ये काश्मिरी लोकांना त्यांची इच्छा प्रकट करण्यासाठी जनमताची चाचणी घेण्याबाबत तरतूद नमूद करण्यात आली होती, असेही जिलानी यांनी म्हटले.

## समूह विद्यापीठ: अनुदान बंद करण्याचा छुपा अजेंडा



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अभियान राबवून देशातील पहिल्या तीन राज्यांमध्ये स्थान मिळवलेल्या महाराष्ट्राचा शैक्षणिक निर्देशांक आता घसरला आहे. केंद्र सरकारने जाहीर केलेल्या शैक्षणिक सत्र २०२१-२२साठी 'पीजीआय' म्हणजेच 'परफॉर्मन्स ग्रेडिंग इंडेक्स २.०' अहवालात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावरून थेट सातव्या क्रमांकावर आला आहे. तर जिल्हानिहाय जाहीर झालेल्या शिक्षण निर्देशांकात बहुतांश जिल्ह्यांची शैक्षणिक पडझड झाल्याचं समोर आलं आहे.या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी होत आहे..**

महाराष्ट्राला प्रगत बनविण्याच्या दृष्टीने शैक्षणिक क्षेत्रात अनेक क्रांतिकारक निर्णय घेतले जात आहे त्यात आता समुह विद्यापीठाची भर पडली आहे.नवीन शैक्षणिक धोरणातील उदिष्टांना अंमलात आणण्यासाठी व विद्यार्थ्यांना कौशल्यपूर्ण,व्यावसायिक शिक्षण देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सरकारच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने समूह विद्यापीठाची एक अभिनव संकलपना पुढे आणली.मात्र समुह विद्यापीठाच्या माध्यमातून महाविद्यालयांना स्वयंपूर्ण करण्याचा व हळू हळू त्यांचे अनुदान बंद करण्याचा छुपा अंजेंडा या समुह विद्यापीठाच्या मागे दडलेला आहे.सध्या अनुदानित महाविद्यालयाला सरकारकडून अनुदान मिळत असते..सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन सरकार देत असते.उच्च शिक्षणावरील होणाऱ्या खर्चाचा भार हळूहळू कमी करण्याचा थेट उद्देश शासकीय कागदपत्रांत नसला तरी तो पुरता लपलेलाही नाही. सध्याच्या शासकीय विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालये समूह विद्यापीठांत परिवर्तित झाल्यानंतर या विद्यापीठांची आर्थिक भिस्त भविष्यात विद्यार्थी व देणगीदारांवरच असणार आहे. समुह विद्यापीठाच्या माध्यमातून महाराष्ट्रालाशैक्षणिक दृष्ट्या प्रगत बनविण्याचा उद्देश असला तरी उच्च शिक्षणाचे खाजगीकरण करण्याचा छुपा अजेंडा डाव सरकारचा आहे. नव्या शिक्षण धोरणात निश्चित केलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी 'समूह विद्यापीठ' ही संकल्पना मांडण्यात आली. नव्या धोरणात 'विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये' ही संकल्पना मोडीत काढण्यात आली आहे. त्यामुळे २०३५ पर्यंत विद्यापीठाशी संलग्न सर्व शिक्षणसंस्था या स्वत पदवी प्रदान करणाऱ्या संस्था म्हणजेच विद्यापीठे व्हावीत असे उद्दिष्ट आहे. सध्या शासकीय विद्यापीठे ही त्यांच्याशी संलग्न असलेल्या शेकडो महाविद्यालयांचे वेगवेगळया पातळीवर नियमन करतात. विद्यापीठांवरील तो भार कमी करून विद्यापीठांनी संशोधन आणि शैक्षणिक बाबींवर अधिक लक्ष केंद्रित करावे अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळेच महाविद्यालयांच्या छोटया समूहांना एकत्र करून त्यांचे स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याची संकल्पना पुढे आली. राज्यात २०१८ मध्येच समूह विद्यापीठांची अंमलबजावणी सुरू झाली. सध्या राज्यात तीन समूह विद्यापीठे आहेत.

प्रगत समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात पारंपरिक विद्यापीठांमधील शैक्षणिक कामकाज मागे पडले. विद्यार्थ्यांना कौशल्यशिस्तयुक्त शिक्षण देण्यात येथील विद्यापीठे कमी पडलीत..संशोधनाच्या बाबतील आपण मागेच राहिलो.नावीन्याचा शोध, संशोधनाला प्रोत्साहन वगैरे गोष्टी फक्त कागदावर उरल्या. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळणाऱ्या अनुदानाच्या लालसेने शिक्षकच कागदोपत्री संशोधन की काय म्हणतात ते करू लागले. ही अनुदाने कशी मिळतात किंवा मिळविली जातात, याच्या रंजक चर्चा महाविद्यालये व विद्यापीठांच्या वर्तुळात खूप ऐकायला मिळतात. परिणामी, विद्यार्थी हा उच्च शिक्षणाचा केंद्रबिंदू राहिला नाही आणि पारंपरिक विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयांची रया गेली. मुले महाविद्यालयात नेमकी शिकतात तरी काय, ही चर्चा बंद झाली. साहजिकच जगाच्या स्पर्धेत टिकणारे विद्यार्थी घडेनासे झाले. केवळ परीक्षा घेणाऱ्या प्रशासकीय संस्था असे स्वरूप या विद्यापीठांना आले. गुणवत्तेशी फारकत घेणारा हा चक्रव्यूह भेदला जावा, एकाच परिसरात विविध शाखांचे शिक्षण मिळावे, एकूणच उच्च शिक्षणाची दिशा आंतरविद्याशाखीय असावी, या हेतूने नव्या शैक्षणिक धोरणातून समूह विद्यापीठांची संकल्पना पुढे आली आहे.

व्यावसायिक अभ्यासक्रमातील विविध अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना शिकता यावेत. त्यांच्याकडे एकापेक्षा अधिक कौशल्ये असावीत, हा यामागचा मुख्य हेतू आहे. खरेतर जगभरातील, विशेषतः प्रगत देशांमधील शिक्षणाने हे आंतरविद्याशाखांचे धोरण, इंटर-डिसिप्लिनरी अप्रोच खूप आधी अमलात आणला. आपण त्या मानाने खूप उशिरा सुरुवात केली आहे. असो. उशिरा का होईना नव्या शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने आता महाराष्ट्र सरकारनेही समूह विद्यापीठांना मान्यतेचा निर्णय घेतला असून राज्याचे त्या संदर्भातील निकष, नियमावली निश्चित झाली आहे. ही घोषणा होताच सर्वसामान्यांच्या मनात पहिली भीती निर्माण झाली, ती ही की आता कोणीही उठून असे समूह विद्यापीठ स्थापन करील आणि आधीच पुरेसे बाजारीकरण झालेल्या शिक्षणक्षेत्राचा पुरता बाजार भरवला जाईल. सध्या अगदी बालवाडीपासून ते पदव्युत्तर व त्यापुढच्या शिक्षणापर्यंतचे संपूर्ण शिक्षण प्रचंड महागडे झाले आहे. प्रवेशासाठी घेतल्या जाणाऱ्या देणग्यांचे आकडे धडकी भरवणारे असतात. विशेषतः व्यावसायिक उच्च शिक्षणात सामान्यांच्या मुलांना शिकताच येणार नाही अशी स्थिती आहे. त्यामुळे या समूह विद्यापीठांच्या स्थापनेचे राज्य सरकारचे धोरण नेमकेपणाने, त्याच्या पात्रता निकषांसह सर्वसामान्यांपर्यंत पोहोचायला हवे. तेव्हा, हे लक्षात घ्यायला हवे, की अशा विद्यापीठाच्या स्थापनेसाठी सरकारने ठरविलेले निकष अगदीच कुणीही पूर्ण करील, असे नाहीत.

सध्या होमी भाभा विद्यापीठ, हैदराबाद (सिंध) नॅशनल कॉलेजिएट या मुंबईच्या दोन आणि साताऱ्याची कर्मवीर भाऊराव पाटील अशा तीनच संस्थांना राज्यात समूह विद्यापीठाचा दर्जा आहे. सरकारच्या नव्या निर्णयामुळे कृषी व आरोग्य शिक्षण सोडून इतर पारंपरिक शिक्षण देणाऱ्या मोठ्या संस्था त्यांची दोन ते पाच महाविद्यालये एकत्र करून नवे समूह विद्यापीठ स्थापन करू शकतील. त्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून संस्थेला स्वायत्त दर्जा मिळाल्याला पाच वर्षे झालेली असावीत. मूल्यांकनाचा सीजीपीए गुणांक ३.२५ अथवा त्यापेक्षा अधिक असावा किंवा नॅशनल बोर्ड ऑफ अॅक्रिडिएशनकडून किमान ५० टक्के गुणांकन हवे. मुख्य कॉलेज किमान वीस वर्षे जुने हवे. त्या महाविद्यालयाची विद्यार्थिसंख्या किमान दोन हजार आणि समूहातील सर्व महाविद्यालयांची विद्यार्थिसंख्या किमान चार हजार हवी. महाविद्यालयाकडे किमान पंधरा हजार चौरस मीटर बांधकामाची इमारत हवी. मुख्य कॉलेजचा परिसर चार हजार हेक्टर तर सर्व कॉलेजचा एकत्रित परिसर किमान सहा हेक्टरचा हवा. ही समूह विद्यापीठे सार्वजनिकच असतील. त्यांच्या कुलगुरूंच्या नियुक्त्या राज्यपालच करतील. सकृद्दर्शनी हे निकष उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात नवी वाट प्रशस्त करणारे दिसतात. ते काटेकोर अंमलात आणले गेले तर या निर्णयामागील मूळ हेतू नक्की साध्य होऊ शकतील. तथापि, या विषयावर सर्व संबंधित घटकांना, शिक्षण संस्था, या क्षेत्रातील तज्ज्ञ आणि पालकांचे प्रतिनिधी म्हणून समाजातील काही लोकांनी एकत्र बसून या वाटेवरील खाचखळगे, काही शिक्षणसम्राटांकडून बक्कळ कमाईसाठी होऊ शकणारी नियम व धोरणाची मोडतोड यावर सांगोपांग चर्चा करायला हवी. प्रतिभावान विद्यार्थी, त्यांची स्वप्ने, त्या स्वप्नांच्या पंखात बळ भरण्यासाठी सरकार व समाजाकडून केले जाणारे प्रयत्न आणि या सर्व प्रयत्नांचे अर्थकारण हे या चर्चेचे मुख्य बिंदू असायला हवेत. तरच उच्च शिक्षणाच्या बाजारीकरणाला आळा बसेल आणि गुणवंतांना जगाची कवाडे उघडी होतील.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० नुसार राज्यात समूह विद्यापीठे स्थापन करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य शासनाने अनेक महाविद्यालयांना एकत्र येऊन समूह विद्यापीठ (क्लस्टर) स्थापन करता येतील. त्यासाठी आवश्यक असलेल्या मार्गदर्शक तत्त्वांना राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली. या निर्णयामुळे शिक्षण संस्था सक्षम होतील. पारंपरिक विद्यापीठांवर संलग्न महाविद्यालयांचा असलेला ताणही कमी होईल,असे शिक्षणं तज्ञांचे मत आहे.राज्याच्या मंत्रिमंडळाने क्लस्टर विद्यापीठ स्थापन करण्यासाठीच्या मार्गदर्शक तत्त्वांना मंजुरी दिली. वेगवेगळी महाविद्यालये, संस्था एकत्र येऊन क्लस्टर विद्यापीठ स्थापन करणार असतील तर त्यांना ५ कोटी रुपयांचा निधीही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच क्लस्टर विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर निर्माण होणाऱ्या संवैधानिक पदांना मान्यता व खर्चाला मंजुरी मंत्रिमंडळाने दिली आहे.

एका जिल्ह्यातील किमान तीन महाविद्यालये एकत्र येऊन समूह विद्यापीठ स्थापन करू शकतील. उदा . अमरावती येथील शिवाजी शिक्षण संस्थेच्या सर्व महाविद्यालये एकत्र करून त्यांचे स्वतंत्र समुह विद्यापीठ स्थापन करता येईल.. त्यातील एक महाविद्यालय हे अनुदानित असणे आवश्यक आहे. समूहातील प्रमुख महाविद्यालयात दोन हजार तर इतर महाविद्यालयांत मिळून दोन हजार असे एकूण चार हजार विद्यार्थी असावेत. तसेच तिन्ही संस्था मिळून १५ हेक्टर जागा असावी, अशा अटी आहेत. अनेक मोठया संस्थांनी एकत्र येऊन समूह विद्यापीठ स्थापन करावे असे आवाहन शासनाकडून करण्यात येत आहे. महाविद्यालयांचे समूह विद्यापीठ झाल्यानंतर त्यांची मूळ विद्यापीठांशी असलेली संलग्नता लगेच संपुष्टात येणार नाही. सध्या प्रवेश घेतलेल्या, शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना मूळ विद्यापीठाचेच प्रमाणपत्र मिळेल. मात्र, विद्यापीठाचा दर्जा मिळाल्यानंतर प्रवेशित विद्यार्थ्यांना समूह विद्यापीठाच्या नावाने प्रमाणपत्र मिळेल.

## काळाचा योग्य विनियोग केला तर भविष्यकाळ उज्ज्वल होतो



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**काळ हा सगळ्यात बलवान असतो.जगात कोणत्याही प्रकारची बाब मिळवता येऊ शकते पण एकदा निघून गेलेला काळ परत मिळवता येत नाही. काळाचा विनियोग हा योग्य प्रकारे झाला तर निश्चितच भविष्यकाळ उज्ज्वल होतो.काळाच मुल्य वेळीच ओळखा वेळ निघून गेल्यानंतर आलेली जाग फार उपयोगी ठरत नाही म्हणून योग्य वेळी जागृत झाल पाहिजे. आपल्या जीवनात आपण काळाचा विनियोग ज्या पद्धतीने करतो त्याच पद्धतीने आपला भविष्यकाळ निर्धारित होत असतो.ज्या पद्धतीने आपण पेरणी करणार तसंच पिक येत असत. सुरक्षित भविष्यासाठी काळाचा योग्य विनियोग केला पाहिजे. काळाची योग्य गुंतवणूक भविष्य सुरक्षित करते.**

तर अयोग्य गुंतवणूक भविष्य चौपट करते.तस पाहिलं तर तारूण्य हा उत्कर्ष होण्याचा काळ असतो.हाच उत्कर्ष होण्याचा कालावधी आपण त्यासाठी त्या दिशेने त्या मार्गावर घालवला पाहिजे.तरच आपलं हित होईल अन्यथा आपलं अहित कोणीही रोखू शकणार नाही.आपण स्वतःच आपल्या जीवनाचे शिल्पकार असतो.आपल चांगलं अथवा वाईट होण्यासाठी इतर कोणीही नाही तर फक्त आपण स्वतः जबाबदार असतो. आपण आपल्या स्वकर्तुत्वावर स्वतःच जीवन घडविण्यासाठी सदैव दक्ष असल पाहिजे. जीवनात वेळेचं महत्त्व ओळखयला शिकलं पाहिजे ज्या कार्यासाठी जी वेळ निर्धारित आहे त्या काळात तेच कार्य प्रथम प्राधान्याने केलं पाहिजे.अन्यथा दुष्परिणाम सह आपणावर पश्चात्ताप करण्याची वेळ येणार हे लिखित सत्य आहे.वेळ निघून गेल्यावर आलेली जाग फार काही उपयुक्त नसते.जीवनात पश्चात्ताप हा कोणालाही नको असतो पण हाच पश्चात्ताप करण्याची वेळ येऊ नये म्हणून आपण दक्ष नसतो हा किती मोठा विरोधाभास आहे.जीवन हे वेगवेगळ्या कालखंडात विभागालेल असतं ज्या काळात जे कार्य कर्तव्य जबाबदारी आहे ते केलच पाहिजे.तो काळ व्यर्थ गेला तर मग उर्वरित कालखंडात अनेक दुष्परिणामांना सामोरे जावे लागते.काळाच उपयोग करण्या बाबत आपलं गांभीर्य ,काळजी सचोटी प्रामाणिकता आणि नियोजन व्यवस्थित असेल तर मग मात्र यत्किंचितही जीवन आपल्याला प्रभावित करू शकत नाही. बालपण जसं जसं संपत येईल तसं तसं जगाची ओळख आपल्याला होऊ लागते.तस तसं एक एक जबाबदारी देखील येऊन पडते. आपण आपला काळ व्यर्थ घालवला तर मग या जबाबदारीच निर्वाहन करत असताना उपलब्ध संसाधन आणि आवश्यक गरजा यांचा ताळमेळ लागत नाही.परिणाम स्वरूप आपलं जीवन संतुलन बिघडत हे वास्तव आहे.अशी वेळ आपल्या जीवनात निर्माण होऊ नये असं मनोमन वाटत असेल वेळेच महत्व जाणायला शिका हे महत्व समजलं नाहीतर मग अनेक प्रश्न समस्या आपल्या जीवनात निर्माण होतात.तारूण्य गडबडल तर जीवन गडबडत म्हणून तारूण्य सत्कारणी लावता आल पाहिजे.आपण आपला काळा व्यवस्थित घालवून आपलं स्वहित साधलं पाहिजे तरच जीवनभर आपलं आर्थिक नियोजन गडबडणार नाही.खर्च आणि उत्पन्न यांचा ताळमेळ लागण्यासाठी स्वतःला वेळे सोबत घडवायला शिकल पाहिजे.आणि इथं चुक झाली तर मग आपलं सगळं नियोजन कोलमडल जाईल आणि आपल्या हातात वेळ देखिल नसेल.वेळ निघून गेल्यावर समज येऊन उत्कर्ष होणार नाही.कारण तोपर्यंत आपल्या आयुष्यातील अमुल्य असा काळ निघून गेलेला असतो. जो काळ आपण जिवनात काहीतरी घडून आपल्या दैनंदिन गरजा व्यवस्थितपणे पुर्ण करु शकू अशी व्यवस्था निर्माण करण्याचा असतो तोच कार्यकाळ आपला बहुधा चुकीच्या पद्धतीने व्यर्थ गेल्याने अनेक समस्या अनेक आव्हानं आपल्या समोर उभी राहतात.जीवनातील आव्हान पुर्ण करताना जो काही त्रास अडचणी निर्माण होतात याला आपण स्वतःजबाबदार आसतो.कारण आपण पंधरा वर्षं ते तीस वर्षे हा घडण्याचा काळ कशा पद्धतीने घालवला कुणाच्या प्रेरणेतून कार्य केले,आपला आधारस्तंभ कोण होत आपली संगती कशी होती,आपण कोणत्या विचाराच्या प्रभावात होतो. त्यानुसारच याचं कालावधीत आपलं धेय्य उद्दीष्ट काय होतं तिथं पर्यन्त पोहचण्यासाठी आपण काय आणि कसे प्रयत्न केले अथवा निष्काळजीपणा केला या पैकी जे केलं ते फल स्वरूप आपल्याला प्राप्त होत.जीवन वाटेवर वयाच्या योग्य टप्प्यावर आपणं सजग असलं पाहिजे. घडण्याच वय बिघडण्यात जाणार नाही यासाठी आपले संस्कार संस्कृती त्याच बरोबर सामाजिक मुल्य जोपासत असताना आध्यत्मिक ज्ञान मार्ग अवलंबला पाहिजे. जेणेकरून आपण आपला जीवन मार्ग चुकणार नाहीत आणि आपला अनमोल वेळ व्यर्थ देखील घालवणार नाहीत.त्याच बरोबर आपलं आयुष्य फुकट वाया गेल असं म्हणण्याची वेळ देखिल आपल्यावर येणार नाही.याची दक्षता घेऊन आपण मार्गक्रमण केले तर नक्कीच आपल जीवन सार्थक होईल.आपलं जीवन घडण्यासाठी अथवा बिघडण्यासाठी कारणीभूत घटक हे आपल्या समजले पाहिजेत.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739




जम्मू काश्मीरसाठीचे कलम ३७० हटवण्याचा मोदी सरकारचा निर्णय वैध असल्याचा महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी दिला. या निर्णयाबद्दल भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यालयात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, ज्येष्ठ नेते रघुनाथ कुलकर्णी, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, उत्तर भारतीय मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष डॉ.संजय पांडेय, प्रदेश प्रवक्ते अतुल शाह, ओमप्रकाश चौहान आदी उपस्थित होते. यावेळी कार्यकर्त्यांनी, "जहां बलिदान हुए मुखर्जी वो कश्मीर हमारा है " मोदी है, मुमकीन है ' अशा घोषणा देऊन परिसर दणाणून टाकला.

# ज्ञानदा धायगुडेने रेखाटले डॉ. बाबासाहेबांचे चित्र

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** ६ डिसेंबर ला महापरिनिर्वाण दिनी अनेकांनी विविध उपक्रम राबवित भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले.

१८-१८ तास अभ्यास करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी काही तास पुस्तक वाचन करण्याचा उपक्रम सुद्धा पाहायला मिळाला.विद्यार्थ्यांच्या दृष्टीने असे उपक्रम नक्कीच प्रेरणादायी आहेत.मी आजन्म विद्यार्थीच आहे, असे बाबासाहेब म्हणायचे.हेच बाबासाहेब आजच्या विद्यार्थ्यांपर्यंत घेऊन जाणे गरजेचे आहे. बाबासाहेबांचा आदर्श विद्यार्थ्यांच्या डोळ्यासमोर आणणे ही खऱ्या अर्थाने आजच्या पालकांची सुद्धा खूप मोठी जबाबदारी आहे. पाडेगाव ता.खंडाळा येथील विद्यार्थीनीने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे चित्र हुबेहूब रेखाटण्याचा प्रयत्न केल्याने तिच्या आई वडीलांना तिचे विशेष कौतूक वाटत आहे.ज्ञानदा दादासो धायगुडे असे या विद्यार्थीनेचे नाव असून तिने महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे चित्र हुबेहूब काढण्याचा प्रयत्न केला.ही विद्यार्थीनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची विद्यार्थीनी असून इयत्ता ४ थी या वर्गात शिकत आहे.परंतु ही विद्यार्थीनी अभ्यासात खूप हुशार आहे. शाळेच्या प्रत्येक उपक्रमातून ती तिचे



कौशल्य दाखवत असते.

ज्ञानदा हिने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चित्र रेखाटल्या बद्दल वडील दादासो धायगुडे यांनी मुलीच्या या कला कौशल्या बद्दल विशेष कौतुक केले.विशेष म्हणजे लहान मुलांमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांसारखा एक ज्ञानी माणूस ज्ञात होत आहे.ज्ञानदा ने अशा महामानवाचे चित्र रेखाटल्याने वडील दादासो धायगुडे यांनी अगदी आनंदाने समाधान व्यक्त केले आहे. मुलीच्या कलेच्या कौतुक केलेले आहे. मुली खरच एखादे काम हाती घेतले की ते काम अगदी मन लावून पूर्ण करत असतात. अभ्यासात जिद्द आणि चिकाटी दाखवत असतात. आजच्या विद्यार्थ्यांना डॉ.बाबासाहेब समजले पाहिजेत. त्यांचा शैक्षणिक प्रवास आणि त्यांनी केलेला संघर्ष या बद्दल आपण पाल्यांचे पालक म्हणून पाल्याला सांगणे खूप गरजेचे आहे, अशा दादासो धायगुडे यांनी व्यक्त केल्या आहेत.

# शौर्य स्पोर्ट्स अकॅडमीच्या खेळाडूंनी केली १० सुवर्ण व ५ रौप्य पदकांची कमाई




आधुनिक केसरी न्यूज

**पहूर :** जळगाव जिल्हा क्रीडा कार्यालय व जळगाव जिल्हा तायक्वांडो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय शालेय तायक्वांडो स्पर्धेत पहूर येथील शौर्य स्पोर्ट्स अकॅडमीच्या खेळाडूंनी १५ पदकांची कमाई करुन पहूरच्या शिरपेच्यात मानाचा तुरा रोवला. आज दिनांक ११/१२/२०२३ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुल जळगाव येथे तायक्वांडो स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या. जिल्हास्तरीय तायक्वांडो स्पर्धेत पहूर येथील शौर्य स्पोर्टस् अकॅडमी च्या १५ खेळाडूंनी सहभाग घेत १० सुवर्ण तर ५ रौप्य पदकांची कमाई करत पहूरच्या शिरपेच्यात मानाचा तुरा रोवला. सुवर्ण पदकांची मानकरी -
गौरी कुमावत, सानिका पाटील, वैष्णवी घोंगडे, वर्षा राऊत, श्रावणी लोहार, नंदिनी सोनवणे, जयश्री घोंगडे, जागृती चौधरी, तृप्ती घोंगडे, लोचना चौधरी यांची सूवर्ण पदक प्राप्त मुलीची नाशिक विभागीय शालेय स्पर्धेसाठी निवड झाली.
रौप्य पदकांचे मानकरी स्वाती चौधरी,वृषाली काळे, हर्षदा उबाळे, वैष्णवी सोनवणे,गायत्री कुमावत. तायक्वांदो स्पर्धेत घवघवीत यश संपादित केल्याबद्दल शौर्य स्पोर्टस अकॅडमी चे उपाध्यक्ष बाबुराव अण्णा घोंगडे जळगाव जिल्हा तायक्वांडो असोसिएशनचे सचिव अजित घारगे, जयेश बाविस्कर श्रीकृष्ण चौधरी, सुनिल मोरे शौर्य स्पोर्ट्स अकॅडमीचे संचालक अँड संजय पाटील, शंकर भामेरे, किरण जाधव, प्रकाश जोशी, संचालिका वैशाली घोंगडे कल्पना बनकर यांनी अभिनंदन कौतुक करून विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. खेळाडूंना शौर्य स्पोर्ट्स अकॅडमी चे सचिव तथा सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाचे क्रीडा शिक्षक हरिभाऊ राऊत यांचे मार्गदर्शन लाभले.

# धनश्री आंबेकरांचे निवेदिका क्षेत्रामध्ये यशस्वी पाऊल

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथील धनश्री आंबेकर ह्या एक उत्कृष्ट निवेदिका असून त्यांनी आतापर्यंत अनेक कार्यक्रमाचे



यशस्वीपणे सूत्रसंचालन केलेले आहे. एक आगळं वेगळं क्षेत्र निवडून त्यांनी आपली एक स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. यशस्वी निवेदिका म्हणून त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे समाजाचं आणि आंबेकर परिवाराचे नाव त्यांनी उज्वल केले आहे. ही एक अभिमानास्पद बाब आहे धनश्री आंबेकर ह्या एक प्रेरणादायी व्यक्तिमत्व आहे आम्हाला त्यांचा सार्थ अभिमान आहे.२६ नोव्हेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथील यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये राज्यस्तरीय तेली समाज वधू वर संपर्क मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते या आधुनिक पद्धतीच्या मेळाव्याचे सुत्र संचालन करून खऱ्या अर्थाने कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी धनश्री आंबेकर यांची महत्त्वाची भूमिका होती. कार्यक्रमाचा आत्माच खऱ्या अर्थाने त्या होत्या. यादी प्रमाणे वधू-वरांना मंचावर आमंत्रित करून वधू वरांच्या आशा अपेक्षा जाणून घेऊन त्यांना भावी आयुष्याचा चांगला जोडीदार शोधयाला त्यांचे प्रयत्न मोलाचे राहिले आहे. त्यांच्यामुळे कार्यक्रमाला रंगत आली कार्यक्रमाची चर्चा सर्वत्र झाली. अनेकांनी धनश्री आंबेकरांचे कौतुक केले आहे. उत्कृष्ट सूत्रसंचालन केल्या बद्दल तेली सेनेच्या वतीने भाजपा नेते अनिल मकरिये यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी संयोजक गणेश पवार, श्रीराम कोरडे, संजय आंबेकर,सुनिल क्षीरसागर, गणेश वाडेकर, रंजना बागूल अर्चना फिरके, गायत्री चौधरी आदींची उपस्थिती होती.

# बंजारा ब्रिगेडच्या महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी अर्जुन नायक

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** तालुक्यातील श्रीष्टी तांडा येथील



रहिवाशी अर्जुन नायक यांची बंजारा ब्रिगेडच्या महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

बंजारा ब्रिगेडच्या मराठवाडा संघटक पदावर कार्यरत असतांना संघटनात्मक क्षेत्रात केलेल्या कामाची दखल घेत प्रदेश कार्यकारिणीवर काम करण्याची संधी संघटनेने अर्जुन नायक यांना उपलब्ध करून दिली आहे. बंजारा शिक्षण सेवा अभियानाचे राष्ट्रीय प्रचारक रमेश बापू महाराज, समन्वयक भरत पवार, प्रदेशाध्यक्ष मुकेश पवार यांच्या शिफाशीवरून बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत राठोड यांनी अर्जुन नायक यांची नियुक्ती केली आहे. आगामी काळात संघटनेची बांधणी करण्यासाठी प्रदेश कार्यकारिणी आणि विभाग, जिल्हा तसेच तालुका कार्यकारिणीशी समन्वय साधून संघटनेची पुढील धेय्य धोरणे राबवावित. बंजारा समाजाला मान, सन्मान, न्याय, हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहावे असे, नियुक्तीपत्रात म्हटले आहे. अर्जुन नायक यांच्या नियुक्तीबद्दल समाजाच्या सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# गुटखा किंगवर मोक्का कारवाई करा

## आर.पी.आय. आंबेडकर गटाची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्हात मध्यप्रदेश मधून गुटखा मागविणारे व धुळे जिल्हात सरासपणे प्रत्येक पान शॉप, किराणा शॉप, हॉटेल्स वर गुटखा पुरविणाऱ्या गुटखा किंग कोण याचा तपास लावून त्यांच्यावर मोक्का अंतर्गत कारवाई करून धुळे जिल्हा मधून गुटखा हद्दपार करा असे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर)चे जिल्हा अध्यक्ष दिनेश निकुंभ यांनी दिले. धुळे शहरापासून मध्यप्रदेश व गुजरात या दोन्ही सीमा जवळ असल्यामुळे जिल्हात तस्करीचे प्रमाण वाढताना दिसून येते. आत्तापर्यंत धुळे जिल्ह्यात करोडो रूपयांचा गुटखा पकडून मोठ्या प्रमाणात कारवाई झाल्या आहेत. पण एवढ्या मोठ्या प्रमाणात धुळे जिल्ह्यात गुटखा, अवैध दारू मागविण्यात कोणाचा हात आहे. एवढा पैसा कोणता गुटखा किंग गुंतवणूक करतो याचा तपास कोणीच करताना दिसत नाही, असा आरोप या निवेदनात केला आहे.

धुळे जिल्ह्यात प्रत्येक पान शॉप, किराणा शॉप, हॉटेल्स, बार ढाबेयावर गुटखा कोणाचाही धाक न बाळगता राजरोसपणे विकला जातो त्यात काही कर्मचारी सुध्दा ड्युटी वर असताना गुटखा खाताना आढळून येतात. तालुका पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचाऱ्यांनी त्यांच्या प्रायव्हेट कार मध्ये २९ ऑगस्ट ते २ सप्टेंबर च्या दरम्यान मध्यप्रदेश मधील बर्हाणपूर येथील गुटखा किंग म्हणून ओळखला जाणारा नामचिन गुंड गुटखा व्यापारी विक्की डिलाणी याला धुळे तालुका पोलीस स्टेशन च्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या लालबाग थाना पोलीस स्टेशन बर्हाणपूर हद्दीमध्ये अटक केली होती त्याच्यावर कारवाई न करता सोडून देण्यात आले होते. त्याच्यावर कारवाई का नाही केली याची चौकशी करून त्या गुटखा किंगला परत अटक करून ताबा घेतल्यास तो धुळे जिल्ह्यात किती गुटखा व्यापारींना गुटखा तस्करी करतो. त्यांचे नाव समोर येतील आपल्या या कारवाई ने अनेक युवकांचे प्राण वाचविले जाऊ शकतात. महाराष्ट्रात अवैध गुटखाच्या सेवनाने कॅन्सर चे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात हौदोस घालत आहे. कमी वयात आई वडिलासमोर मुलांना कॅन्सर मुळे आपला जिव गमवावे लागत आहे. आपणास हात जोडून विनंती करतो की हे गुटखा किंग कोण आहेत हे शोधून यांच्या वर मोक्का अंतर्गत कारवाई करून धुळे जिल्ह्यामधून गुटखा हद्दपार करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली.



# शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य केंद्रांत फळवाटप

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरदजी चंद्र पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आज दि.१२ रोजी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांना फळांची वाटप करण्यात आली. जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेसचे विलासराव चव्हाण, जेष्ठ समाजसेवक पुंजाजी अण्णा नलावडे, व्हाइस चेअरमन राजेंद्र शेठ लग्गड, कारभारी साळुंके यांच्या हस्ते रुग्णांना फळांची वाटप करण्यात आली. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. अंजुम निलोफर, आरोग्य कर्मचारी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# देवदिवाळी : इतिहास, संस्कृती आणि शेतीचे धागे विणणारा सण

आधुनिक केसरी

**कोकणातला बैलपोळा म्हणजे देव दिवाळी. आपल्या कृषिप्रधान संस्कृती मधील महत्वाचा सण. 'मार्गशीर्ष प्रतिपदा' या दिवसाला कोकणात आगळेच महत्त्व आहे. कोणत्याही संस्कृती कोशात व धार्मिक व्रतवैकल्यांच्या ग्रंथात माहिती नसलेला सण म्हणजे देवदीपावली. हा दिवस कोकणात 'देव दीपावली' किंवा 'देवदिवाळी' या नावानं साजरा होतो. सर्जा-राजा वा ढवळ्या-पवळ्या या बैलजोडीच्या शिंगांना रंग फासण्याचा त्यांना गोंडे बांधण्याचा हा दिवस. गाई, बैल, वासरे, म्हशी, रेडे यांच्या शिंगांना रंग लावून, त्यांना गोडधोड खायला घालून हा सण साजरा करण्याची प्रथा आहे. या देवदीपावलीचा उत्साह आबालवृद्धांच्या अंगी संचारलेला असतो. दिवाळी या नावातच उत्साह आहे, आनंद आहे. दिवाळीच्या सणामागील आशय मात्र आपल्याला फार थोडा माहिती असतो. जरा विस्ताराने जाणून घेऊया दिवाळी सणाची माहिती.**

दिवाळी येते ती शरद ऋतूचा आनंद मनात घेऊनच ! आपली भारतीय संस्कृती ही शेतीवर आधारलेली आहे. शारदीय नवरात्र आणि दसरा संपला की पाठोपाठ कोजागिरीची रात्र पूर्ण चंद्रबिंब घेऊन येते. आटवलेल्या केशरी दुधासह आपण ही रात्र जागवतो. या दिवसाला "नवान्न पौर्णिमा" असेही म्हणतात. कारण शेतातून नुकत्याच हाती आणलेल्या धान्याची कणसे देवीला अर्पण केली जातात. या समृद्धीचा आनंद मनात असतानाच पाठोपाठ रमा एकादशी येते. आपण ज्या काळात दिवाळी साजरी करतो त्या काळात अनेक गोष्टी सोप्या झाल्या आहेत. पण ज्यावेळी समाज अधिक प्रमाणात फक्त शेतीवर अवलंबून होता त्याकाळात शेतात पिकलेले धान्य ज्यावेळी कोठारात भरेल आणि विकले जाईल तो काळ समृद्धीचा मानला जाणे स्वाभाविक होते. त्यामुळे धान्याची मुबलकता असताना आणि शरद ऋतूचा आल्हाद असताना दोन्हीचा एकत्र आनंद घेण्यासाठी दिवाळी सणाची योजना झालेली दिसते. प्रसिद्ध गोवंश अभ्यासक व पशुतज्ज्ञ मिलिंदजी देवल यांनी या सणामागची कारणमीमांसा फार चिकित्सकपणानं उलगडून दाखवलीय. ओला-चारा बैल माजले- लेझीम चाले जोरात
शेतकरी मन प्रसन्न झाले- ढामटीकी ढूमढूम।।
एका सुप्रसिद्ध मराठी कवीच्या या ओळी सत्यातच उतरलेल्या असतात. भारत कृषिप्रधान देश आहे. येथील शेती पावसावर अवलंबून आहे. म्हणून शेतकरी आकाशाकडे नजर लावून पावसाची वाट पाहत बसतो. पाऊस पडताच पिके तरारून उठतात. फुलझाडांना बहर येतो. फुलांचा सुगंध आसमंतात दरवळतो. तुकड्या-तुकडयांत विभागलेली व अडचणीच्या जागेत, डोंगरात, कडयाकपारीत असलेली शेती कसायला, शेतक-याला बैल हा जीवाभावाचा सखासोबती वाटतो. शेतकरी आपल्या बैलजोडीची कसोशीनं निगा राखतो. रानवनातला हिरवागार चारा (गवत) आणि पेंड घालून थंडी पडायला सुरुवात झालेली असते. कोकणातली थंडी म्हणजे हाडं गोठवणारी. ओला चारा कसदार झालेला असतो. कोवळी उन्हं आल्हाददायक वाटू लागतात. अशा वेळी कोकणातील शेतकरी जवळजवळ शेतीच्या कामातून मोकळा झालेला असतो. टपोर्‍या भरलेल्या भाताच्या लोंब्या उभ्या पातीला पेलवेनाश्या झाल्या आणि दाण्यांसह पानंही सोन्यागत पिवळी पडायला लागली, म्हणजे समजायचे की आता भात काढणीला आले आहे. उन्हाळी भाजीपाला, नाचणीची कापणी संपलेली असते, अशा वेळी पशुधनाप्रति आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा दिवस निवडला गेला असावा, असं मिलिंद देवल यांनी सांगितलं. मार्गशीर्षातील शुद्ध प्रतिपदा म्हणजे देवदीपावली हे संस्कृती व परंपरेतील सण आपण डोळसपणानं स्वीकारायला हवेत.

या दिवाळीची सुरूवात होई ती अश्विन वद्य द्वादशीला म्हणजे गोवत्सद्वादशीला. हा सण म्हणजे पशूधनाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचं एक माध्यम आहे. अवघ्या कोकणात या दिवसाच्या तयारीसाठी आधीपासूनच धामधूम सुरू होते. कोकणातील देवदिवाळी म्हणजे जणू बैलपोळाच !

**अरड मरद बैल खरड**
**देव दिवाळी गाई म्हशी ओवाळी**
**दीन दीन दिवाळी, गाई म्हशी ओवाळी**
**गाई म्हशी कुणाच्या,लक्ष्मणाच्या,**
**लक्ष्मण कुणाचा, आईबापाचा ...**
**दे ग माय खोबऱ्याची वाटी,**
**वाघाच्या पाठीत घाली काठी...!**

हे गीत आठवलं की जाणीव होते देव दिवाळीची, पोलादपूर तालुक्यात ही दिवाळी उत्साहात आणि आनंदात साजरी होत असते. या ऐतिहासिक दिवाळीच्या वर्णनाच्या काही नोंदी तत्कालीन पेशवाई दप्तरातील कागदपत्रांमध्ये आढळतात. या दिवाळीपूर्वी दोन महिने आधी काही शेतकरी आपल्या बैलांना रानातला हिरवागार चारा आणि पेंड घालून धुष्टपुष्ट करतात. शरीराने मस्तवाल झालेला बैल पाहूनच आणि तो मारकुटा असला तर उरात धडकी भरली पाहिजे अशी त्यांनी त्याची तयारी केलेली असते. बैल दिवाळीच्या अगोदरच्या आठवड्यापासून आपल्या बैलावर प्रेम करणारा शेतकरी किंवा गावात असलेली शाळकरी मुलं बैलांच्या शिंगांना रंगबेरंगी गोंडा लावण्यासाठी रानातून खवशीचे झाड तोडून आणतात. त्याच्यावर दिवसरात्र बरीच मेहनत केल्यानंतर त्यापासून गोंडा बनवतात. गोंडा तयार झाल्यानंतर त्याची विणलेली वीण आणि त्याला लावलेला रंगबेरंगी रंग फारच आकर्षक दिसतो. त्यानंतर आदल्या दिवसापासूनच बैलाच्या शिंगाना तो गोंडा बांधण्यासाठी आणि तो सहज कुणी उपटू नये यासाठी मेहनत घेतात. बैलाच्या शिंगाना गुळ आणि चुना लावून तो अधिक घट्ट चिटकेल व तो गोंडा सहजासहजी कुणालाही उपटता येणार नाही असा प्रयत्न यामागे असतो. आपल्या सजवलेल्या बैलाकडे त्या दिवशी तर घरधनीण (गृहलक्ष्मी) आणि बैलाचा मालक




(बळीराजा) मायेने निरखून पाहत असतात. शेतकऱ्याचे हृदय अभिमानाने फुलून जात असते कारण तो मनोमन कबूल करीत असतो की त्याची मेहनत आणि घाम त्याच्या विश्वासू बैलाच्या घामाशी अखंडपणे गुंफलेले आहे, जो पेरणी, पालनपोषण आणि कापणी या शाश्वत नृत्यात आपला भागीदार झालेला असतो म्हणून घरात असलेली धान्याची कणगी भरलेली असते.
त्या दिवशी शक्यतो घराघरात वडे-मटणाचा झणझणित बेत ठरलेला असतो. सोयरे धायरे पाहुणचारासाठी आलेले असतात. हे सजवलेले बैल ज्या पूर्वपरंपरागत खाचरात दिवाळी साजरी होते त्या ठिकाणी आणून बांधून ठेवले जातात. गावातील आबालवृद्ध आणि आजूबाजूच्या गावातील पैपाहुणे, सगे-सोयरे त्या खाचराच्या बांधांवर हातात काठी घेऊन उभे असतात. सोडल्यानंतर मस्तवाल बैल गर्दीच्या दिशेने जर अंगावर आला तर त्याला हुसकावण्याचा प्रयत्न होतो. गावऱ्हाटीच्या परंपरेनुसार त्यानंतर दिवाळीला सुरुवात होते. मानकऱ्यांच्या प्रथेनुसार एका अंगणात गावातील मुख्य एकत्र येतात. त्याठिकाणी फुले-रांगोळीचा कना काढून त्यावर बैलांना बांधण्यासाठीचा मजबूत जाडीचा एक दोरखंड (सोल) ठेवलेला असतो. ग्रामदेवतेला गाऱ्हाणे घालून त्याची पूजा केली जाते त्यानंतर मानाचा बैल त्याठिकाणी आणून त्याला सोल लावून वाजंत्र्यांसोबत तो गावदेवी आणि हर हर महादेवाचा गजर करीत दिवाळीच्या खाचरात घेऊन जातात. सोलाच्या मध्यभागी बैल बांधलेला असतो तर दोन्ही बाजूने १५-२० तरबेज गडी ती सोल पकडून असतात. त्या खाचरात एका ठिकाणी मांगोळी उभारलेली असते. तो बैल त्या ठिकाणी आणल्यास त्याला बकऱ्याचे कातडे लावलेल्या लांब काठीने हुसकावले जाते, त्यामुळे तो बैल वाजंत्र्याच्या तालावर नाचायला लागतो. बैल जर मारकुटा आणि रागीट असला तर तो ढुशी मारून सोलकऱ्यांना लोळवतो किंवा खाचरात असणाऱ्यांना शिंगाने मारायला धावतो. थोडावेळ असे केल्यानंतर त्या बैलाला बांधलेला गोंडा उपटण्यासाठी दिवाळीसाठी आलेल्या सोयऱ्यांना बोलावले जाते अनेकदा काही हौशी व्यक्ती स्वतःच बेधडकपणे पुढे जातात, आणि बैलाशी झुंजण्याचा व गोंडा उपटण्याचा प्रयत्न करतात. काहीवेळा एखादा उत्साही गडी बैलाच्या ताकदीचा अंदाज न आल्याने जखमी होतो. यानंतर जेव्हढे बैल दिवाळीसाठी आणलेले असतात ते एकामागोमाग एक खाचरात आणले जातात आणि वाजंत्र्याच्या तालावर नाचवले जातात. पोळ्याच्या निमित्ताने महाराष्ट्रात वेगवेळ्या पद्धतीने विशेषतः पोलादपूर तालुक्यात सावित्री-कामथी-ढवळी खोऱ्यातील हा एक महत्त्वपूर्ण कृषी उत्सव आहे, नांगर आपल्या हातात असेल, पण पुढे नांगरण्याची ताकद आणि चैतन्य बैलाच्या हृदयातून येते. ज्यांच्या घामाने मातीचे पोषण होते. आणि श्रमाने शेतात रान होते आणि आशेचे बीज पेरले जाते. जेव्हा बैल पुढे जातो,आमच्या उदरनिर्वाहाचा मार्ग नांगरतो तेव्हा समृद्धी येते. एका कालातीत महाकाव्याप्रमाणे, शेतकरी आणि बैल यांच्यातील एक न बोललेल्या परंतु गहन बंधनाची गाथा कथन करतो, या सणाद्वारे ग्राम्य संस्कृती गावकऱ्यांची एकता व केवळ उपजीविकाच नाही तर ग्रामीण भारताची भावना देखील टिकवून ठेवते. अलीकडच्या काळात तरुणाईने उदरनिर्वाहासाठी शहरांकडे धाव घेतली आहे. गावच्या गावे आणि वाड्यावस्त्या ओस पडत चालल्या असताना ही देवदिवाळी साजरी करण्यासाठी हौसेने जाणारी तरुणाई आजही मोठ्या प्रमाणात आहे. शिकल्या सावरल्या आजकालच्या पिढीला शारीरिक ताकद दाखविण्यासाठी उद्युक्त करणारा हा सण म्हणजे कदाचित वेडेपणा वाटेल परंतु आपले वाडवडील म्हणजे बळीराजा यांनी ही कृषी संस्कृती जोपासण्यासोबतच पशुधनही जोपासत आला आहे. पोलादपूर तालुक्यातील हा एक सण आहे जो पिढ्यानपिढ्या ओलांडतो आहे. एक परंपरा आहे जी इतिहास, संस्कृती आणि शेतीचे धागे कृतज्ञता आणि आदराच्या मायेमध्ये विणली जाते. शेतकऱ्यांची लवचिकता, बैलांची ताकद आणि समाज आणि संस्कृती टिकवून ठेवणाऱ्या कृषी जीवनशैलीचे सौंदर्य साजरे करण्याच्या या बैल दिवाळीच्या दिवशी स्थानिक परंपरेनुसार तुम्ही मनापासून जेव्हा सामील व्हाल तेव्हा तुमच्या मनात आनंद, उत्साह घेऊन येणारी दिवाळी संध्याकाळी संपते ती मात्र मनाला हुरहुर लावून.

**रवींद्र मालुसरे**
अध्यक्ष, मराठी वृत्तपत्र लेखक संघ
मुंबई, ९३२३११७७०२

# शरद पवार : आठवणीतले किस्से

आधुनिक केसरी

**१२ डिसेंबर देशाचे माजी संरक्षण व कृषीमंत्री शरदचंद्र पवार साहेबांचा वाढदिवस. शरद पवार आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे या दोन व्यक्तीमत्वाबद्दल मला फार आकर्षण. या दोन दिग्गज नेत्यांची भेट व्हावी,त्यांच्या सोबत काही क्षण काढता यावेत आणि त्यांच्या समवेत फोटो टिपता यावा असे मला नेहमीच वाटायचे. पैकी शरद पवार साहेबांसोबत माझी भेट झाली परंतु हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या सोबत प्रयत्न करूनही भेट होऊ शकली नाही याची कायम खंत असणार आहे. साधारणतः १९८०- चा काळ असावा.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

मुख्यमंत्री म्हणून शरद पवार पायउतार झाल्यानंतर त्यांनी महाराष्ट्र पिंजून काढला होता. सुल्ताणपूर ता लोणार येथे सोसायटी च्या आवारात शरद पवार यांची छोटेखानी सभा झाली होती.त्या सभेचे सूत्रसंचालन माझे बाबा स्व रा ना पवार यांनी केले होते.सभा संपल्यानंतर सुल्ताणपूर च्या जालना चौफुली वर शरद पवार किनगावराजा,सिंदखेडराजा राजा येथील सभेसाठी जात असतांना ते माझे बाबा,स्व विश्वनाथबापू भानापुरे, भुजंगराव सिरसाट,स्व प्रल्हाद पाटील,स्व किसनराव पिसे व इतर सुल्ताणपूर ची मंडळी सोबत ते संवाद साधत होते.सभा फारसी मोठी नव्हती.जेमतेम 200 / 400 लोकं असावेत. या सभेनंतर त्यांचा हा वार्तालाप सुरू असतांना ते माझ्या बाबांना म्हणाले,रामभाऊ ( माझ्या वडिलांचे नाव रामराव,परंतु रामभाऊ लिंगाडे आणि शरद पवार त्यांना रामभाऊ म्हणायचे ) चला किनगावराजा- सिंदखेडराजा पर्यंत असे म्हणून त्यांनी बाबांना त्यांच्या अंबेसीटर मध्ये बसवले. तिथे मी आणि स्व विश्वनाथ बापू भाणापूरे यांचा मूलगा शिवशंकर भानापुरे आम्ही दोघे मस्ती करत होतो. ईथे मोठी मोठी प्रतिष्ठित माणसे गप्पा करत आहेत याचे आम्हाला काहीही घेणेदेणे नव्हते.आमची मस्ती सुरू असतांना शिवशंकर ने अंबेसिटर चे गेट लोटले आणि त्यात शरद पवार यांचे बोट चेंदल्या गेले.मोठी मंडळी आमच्यावर रागावली,मात्र शरद पवार साहेबांनी आपल्या चेहऱ्यावर दुःख किंवा वेदना न दाखवता असू द्या,लहान मुले आहेत ती असे म्हणून इतरांना त्याकडे दुर्लक्ष करायला लावत त्यांची गाडी किनगावराजा- सिंदखेडराजा कडे बाबांना सोबत घेऊन धावत सुटली. ही नकळत्या वयातील भेट वगळता त्यांच्याशी कधी प्रत्यक्ष संवाद साधता आला नाही. तेव्हापासून शरद पवार साहेबांना भेटण्याची तीव्र इच्छा. बाबांचे अतिशय जवळचे मित्र शिवाजीराव पाटील बुलडाण्याचे आमदार असतांना त्यांनी १९७८ ला शरद पवार यांची साथ देऊन ते पुलोद सरकार मद्धे सहभागी झाले होते.

पवार साहेबांच्या त्या पुलोद सरकार मध्ये ते पाटबंधारे राज्यमंत्री होते.त्यावेळी शिवाजीराव पाटील यांच्या समवेत देखील बाबांची अनेकदा शरद पवार साहेबांसोबत भेट झालेली.बाबांच्या वक्तृत्वाविषयी,शिक्षणक्षेत्रासह राजकीय जाणतेपणाविषयी शिवाजीराव पाटील यांनी बाबांबाबत पवार साहेबांना अवगत केलेले होतेच,शिवाय शरद पवार साहेब हे १९८८ ला मुख्यमंत्री असतांना त्यावेळी माझें काकां स्व अजाबराव पवार यांना मुंबई येथे हृदयाच्या शस्त्रक्रियेसाठी नेण्यात आलेले होते. काकांचा ब्लड ग्रुप हा 'ओ' निगेटिव्ह होता.हा रक्त गट अतिशय दुर्मिळ असल्याने 'ओ' निगेटिव्ह ग्रुप चे रक्त हॉस्पिटलमध्ये उपलब्ध नसल्याचे व्यवस्थापणाने बाबांना सांगितले. बाबांनी थेट मंत्रालय गाठले. मुख्यमंत्री असलेल्या पवार साहेबांची भेट घेऊन त्यांना अडचण सांगितली. आपली ही अडचण इथेच सुटू शकणार हा विश्वास बाबांना असल्याने ते मंत्रालयात गेले होते. शरद पवार यांनी बाबांचे



म्हणणे ऐकले,त्यांच्या खासगी सचिवांना बोलावून घेतले आणि बाबांना ठीक म्हणून जाण्यास सांगितले.
त्यावेळी आजच्या सारखे शेकडो चॅनल नव्हते. त्यावेळी शरद पवार साहेबांनी या रक्त गट संदर्भातील सूचना दूरदर्शन वर प्रसारित करायला लावली. एकदा-दोनदा नव्हे तर अनेकवेळा कार्यक्रमाच्या मधात ही सूचना प्रसारित झाली अन एक रक्तदाता जे जे हॉस्पिटलमध्ये आला,आपले नाव गाव, टेलिफोन नंबर कुठलीही माहिती न देता रक्तदान करून निघून गेला,बाबांच्या विनंती नंतरही त्या अनामिक रक्तदात्याने साधा चहा देखील बाबांकडून पिला नाही.अशा पद्धतीने काकांच्या शस्त्रक्रिया साठी असलेली अडचण शरद पवार साहेबांसारख्या जाणत्या नेतृत्वामुळे दूर होऊ शकली. पवार साहेबांच्या भेटीसाठी मी कधी प्रयत्न केले नाही.ते अनेकदा बुलडाणा आले परंतु त्या कार्यक्रमांना देखील जाऊ शकलो नाही,परंतु त्यांच्या भेटीची सुप्त इच्छा तशीच मनात घर करुन असतांना माजीमंत्री भारत बोन्द्रे यांच्या नागरी सत्काराला शरद पवार साहेब चिखली येथे आले आणि त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस चे नेते भास्करराव काळे यांच्या मुळे चिखली च्या विश्रामगृहावर पवार साहेबांची भेट झाली आणि त्या भेटीने मनात कायमचे घर केले. भास्करराव काळे यांनी माझी पत्रकार म्हणून ओळख करून देत असतांना, हा रा ना पवार गुरुजींचा मुलगा आहे.असे सांगितले. तेव्हा शिंदे गुरुजी सोबत असायचे ते का. ?असे त्यांनी भास्करराव काळे यांना विचारले आणि काळे साहेबांनी 'हो', तेच असे सांगताच माझ्या खांद्यावर पवार साहेबांनी हात टाकला. खरं म्हणजे शरद पवार साहेबांच्या ह्या भेटीने मी एव्हडा हरकून गेलो होतो की,माझं चित्त सगळं माझ्या मोबाईल मध्ये. त्यांच्या सोबत एखादा फोटो घेता यावा म्हणून माझी धडपड सुरू होती. दिवाळी नंतर 18 व 19 नोव्हेंबर ला बारामती येथे व्हाईस ऑफ मीडिया चे अधिवेशन संपन्न झाले.या अधिवेशनात देशोन्नती चे एडिटर -इन-चीफ लोकनायक प्रकाशभाऊ पोहरे यांना शरदचंद्र पवार साहेबांच्या हस्ते जीवनगौरव हा पुरस्कार देऊन गौरविल्या गेले. माझी ज्यांच्यावर नितांत श्रद्धा आहे अशा लोकनायक प्रकाशभाऊ पोहरे यांच्या या सन्मान सोहळ्याला मला उपस्थित राहण्यासाठी मी आतुर होतो,शिवाय व्हाईस ऑफ मीडिया चा मी राज्यकार्यकारीणी चा सदस्य असल्याने मिमित्रांसंमवेत दि 17 रोजीच बारामती कडे निघालो. प्रकाशभाऊ पोहरे हे 17 नोव्हेंबर रोजी पुणे येथे एका कॉन्फरन्स व कार्यक्रमासाठी गेलेले होते.शरद पवार साहेबांनी त्यांना संपर्क करून कुठे आहात याची विचारणा केली.पुण्यात न थांबता गोविंदबागेत मुक्कामी या,मनमोकळ्या गप्पा होतील असे म्हणून पोहरे साहेबांना त्यांनी बारामती ला बोलावले. रात्री उशीर झाल्याने सकाळी पुन्हा शरद पवार साहेबांनी त्यांना त्यांच्या गोविंदबाग या निवासस्थानी नाश्त्याला बोलावले. प्रकाशभाऊ पोहरे यांनी याबाबत मला अवगत केले होते.मात्र माझ्या सासऱ्यांची प्रकृती बिघडल्याने मला शिर्डी वरून गावी परतावे लागले. अन्यथा या विशेष भेटीचा मी एक साक्षीदार होऊ शकलो असतो. शरद पवार साहेबांच्या राजकीय वाटचाली वर लाखोंनी लिहले आहे,मी सुद्धा त्यांच्या व्यक्तिमत्वावर खूप काही लिहू शकतो. परंतु त्या विषयाला हात न घालता आमच्या परिवाराशी निगडित काही आठवणी त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मनात रुंजी घालत होत्या.

# रस्ता बांधणीकडे आता तरी लक्ष देतील काय ?



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**इंडियन रोड कॉँग्रेसच्या 82 व्या वार्षिक अधिवेशनाला संबोधित करताना केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी गांधीनगर येथे सांगितले की, भारतात दरवर्षी पाच लाख रस्ते अपघात होतात, ज्याचे एक कारण अनेकदा सदोष रस्ते अभियांत्रिकी आहे.अपघात होतात आणि दीड लाख लोकांचा मृत्यू होतो, तर तीन लाख लोक जखमी होतात. यामुळे देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनाला (जीडीपी) तीन टक्के तोटा होतो. बळीच्या बकऱ्याप्रमाणे प्रत्येक अपघातासाठी चालकाला जबाबदार धरले जाते.**

मात्र रस्त्याच्या चुकीच्या अभियांत्रिकीमुळेदेखील अनेकदा अपघात होतात. असे स्पष्ट करताना त्यांनी जीव वाचवण्यासाठी अभियंत्यांना अपघात प्रवण रस्त्यांतील अभियांत्रिकी त्रुटी दूर करण्याचे आवाहन केले. मंत्री गडकरी यांनी खरे तर लाखमोलाची गोष्ट केली आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने (MoRTH) जारी केलेल्या अहवालानुसार गेल्या वर्षी (2022) भारतात एकूण 4,61,312 रस्ते अपघातांची नोंद झाली. या अपघातांतील मृतांची संख्या 1,68,491 वर पोहोचली असून सुमारे 4.45 लाख लोक जखमी झाले आहेत. 2021 च्या तुलनेत भारतात अपघातांची संख्या सुमारे 12 टक्क्यांनी वाढली आहे, तर मृत्यूच्या संख्येत 9.4 टक्क्यांनी वाढ झाली आहे. भारतात 2019 मध्ये चार लाख 80 हजार 652 अपघात झाले आणि त्यात एक लाख 51 हजार 113 व्यक्ती मृत्युमुखी पडल्या. वाढते अपघात आणि त्यात आपण गमावत असलेल्या मनुष्यबळाचे चित्र भयावह आहे. रस्ते अपघातात मृत्यूमुखी पडणाऱ्यांच्या संख्येत भारत जगात पहिल्या क्रमांकावर आहे. त्या खालोखाल चीन आणि अमेरिका आहे. आपल्या देशातील अपघातांच्या कारणांचा शोध घेताना चालकांचा निष्काळजीपणा आणि वेग अशा गोष्टींना जबाबदार धरले जाते. मात्र यात रस्ता बांधणीच्या सदोषांचाही मोठा आहे, याचा विचारच केला जात नाही. वास्तविक रस्ता सुरक्षेविषयीच्या सर्वोच्च न्यायालयाच्या समितीने राज्य सरकारांना काही सूचना केल्या आहेत. अपघाताच्या कारणांचा शोध घेताना रस्त्यांच्या बांधकामाचा आराखडा हा घटकही प्रामुख्याने विचारात घ्यायला हवा, असे नमूद केले आहे. मात्र रस्त्यांच्या बांधणीचे स्वरूप, अभियांत्रिकी यांतील उणीवांची चर्चादेखील होत नाही. या प्रश्नाची सोडवणूक करायची असेल तर सर्व पातळ्यांवर समन्वित प्रयत्नांची गरज आहे.

सुरक्षित रस्त्यांची बांधणी, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, रस्ता वाहतूकविषयक नियमांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा, प्रबोधन व त्यासाठी माहिती-तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर अशा सर्व आघाड्यांवर काम व्हायला हवे आहे. त्यासाठी सर्व



संबंधित खात्यांमध्ये उत्तम समन्वय आणि कायदा अंमलबजावणीची प्रभावी यंत्रणा यांची आवश्यकता आहे.भारतीय रस्त्यांच्या संदर्भात भौमितिक त्रुटींचा प्रश्न खूप मोठा आहे. सुरक्षेच्या संदर्भात रस्त्यांचे ऑडिट न करता ते उपयोगात आणले जातात. चुकीच्या रस्ता बांधणीमुळे अपघात झाला तर एकूणच त्या रस्त्याची केवढी मोठी किंमत मोजावी लागते,याचा विचार होत नाही. सुरुवातीच्या भांडवली खर्चापेक्षा कितीतरी अधिक किंमत मोजावी लागते आणि यात होणारे नुकसान अपरिमित असते. त्यामुळे अपघाताच्या अन्य कारणाबरोबरच रस्ता बांधणी व त्यातील अन्य त्रुटींचा विचार करून रस्त्यांची निर्दोष बांधणी आणि आखणी व्हायला हवी.

गडकरी यांनी याच भाषणात म्हणाले, “माझाही अपघात झाला आणि माझी चार हाडे मोडली. अनेक लोक मरत आहेत. 18 ते 34 वयोगटातील लोकांमध्ये 60 टक्के अपघाती मृत्यू होतात आणि त्यापैकी बरेच अभियंते आणि डॉक्टर असू शकतात. हे देशासाठी चांगले नाही. अभियंता मंडळींना उद्देशून ते म्हणाले, एक अभियंता म्हणून तुम्ही स्वतःहून दखल घेऊन अपघाताची कारणे दूर केली पाहिजेत. मी तुम्हाला विनंती करतो की सदोष अभियांत्रिकीमुळे होणारे रस्ते अपघात टाळण्यासाठी काम करा.” आपल्या देशातील वाढते रस्ते अपघात लक्षात घेता रस्ते तयार करताना अपघात टाळण्यासाठी ते योग्य प्रकारे इंजिनीयर केलेले आहे की नाही याची काळजी घेतली पाहिजे.

# व्हायोलिन : काहींच्या मते जर्मन शोध!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**आंतरराष्ट्रीय संगीत दिवस दरवर्षी १ ऑक्टोबर रोजी येतो. प्रसिद्ध व्हायोलिन वादक आणि माजी आंतरराष्ट्रीय संगीत परिषदेचे आईएमसी अध्यक्ष, येहुदी मेनुहिन यांनी आंतरराष्ट्रीय संगीत दिवस म्हणून घोषित केल्यानंतर १९७५ मध्ये त्याच दिवशी पहिल्यांदा साजरा करण्यात आला आणि दरवर्षी १३ डिसेंबर रोजी व्हायोलिन दिन साजरा करण्यात येऊ लागला. या दिवसला अधिकृतपणे युनेस्कोने ओळख दिली आहे. पंडित समता प्रसाद या त्रिकुटाने व्हायोलिन-सनई-तबला या वाद्यांच्या जुगलबंदीने अफाट लोकप्रियता मिळवली होती. व्हायोलिनचा जो एक मोकळा, दमदार, घुमदार आवाज आहे, तो त्याच्या लाकडी बॉडीमुळे. त्या बॉडीलाच ध्वनिपेटिका असे म्हणतात.**

हे लाकूड विशिष्ट प्रकारचे असते. आपल्याकडे जसे तंबोऱ्याचे भोपळे पंढरपूर, मिरज या भागातच होतात, तसे व्हायोलिनचे लाकूड युरोपातील विशिष्ट प्रदेशात उपलब्ध होते. म्हणूनच इटालियन व जर्मन बनावटीची व्हायोलिने जगात सर्वोत्तम मानली जातात. या विशिष्ट लाकडापासून बनविलेली व्हायोलिनची ध्वनिपेटिका, त्याचा विशिष्ट आकार, धातूच्या तारा यामुळे व्हायोलिनला विशिष्ट आवाज प्राप्त झाला आहे. तरफांच्या जादा तारा लावताना व्हायोलिनच्या ध्वनिपेटिकेला कडेने खुंट्यांची सोय केली जाते. त्या वेळेस ध्वनिपेटिकेचे लाकूड दाबले जाते व त्यातून बद्ध व दबलेला आवाज येतो.

हे वाद्य जितके मधुर वाजते, तितकेच सुंदर दिसते. याचा नाजूक, आकर्षक, कमनीय आकार व बदामी तुळतुळीत रंग प्रथम दर्शनीच लक्ष वेधून घेतो. केवळ चार तारा सुरांत लावल्या की, मनात योजाल ते संगीत साकार करता येते. या वाद्याला कोठी (बॉडी), त्याला लागून असलेली लांब दांडी आणि गज असे तीन भाग आहेत. कोठीला चार तारा असतात. धातूच्या या तारांची लांबी सारखी असली तरी जाडी कमी-जास्त असते. जाडीवर तारेच्या स्वरांची उंची अवलंबून असते. तारेची लांबी व तिची कोठ्यापासूनची उंची यांचे प्रमाण व्यस्त असते. तार जितकी लांब तितका स्वर ढाला, खर्जातला असतो. तार जितकी आखूड तितका स्वर उंच असतो. लांबीला समान असणाऱ्या व्हायोलिनच्या तारांचा स्वर त्यांच्या जाडीवर अवलंबून असतो.

एका सिद्धांतानुसार भारतीय वाद्याचे मूळ नाव “व्हायोलिन- बेला” होते. हा दृष्टिकोन ठेवणाऱ्यांच्या मते, लंकापती रावणाने एका वाद्याचा शोध लावला जो गळक्याने वाजवला जाऊ शकतो. त्याचे नाव होते रावणास्त्रम. यानंतर हे वाद्य स्पेनमधून पारशिया, अरबस्तान मार्गे भारतापर्यंत आणि ११व्या शतकाच्या शेवटी जगभर गेले. तेथे आज आपल्याला माहित असलेल्या व्हायोलिनमध्ये त्याचे संपूर्ण रूपांतर झाले. एका



पाश्चात्य अभ्यासकाने असा दावा केला आहे की व्हॉइल म्हणून ओळखले जाणारे एक वाद्य ४०० वर्षांपूर्वी युरोपमध्ये तयार केले गेले आणि सोळाव्या शतकाच्या अखेरपर्यंत ते तेथे लोकप्रिय झाले. या व्हॉइल उपकरणाची रचना नंतर व्हायोलिन तयार करण्यासाठी वापरली गेली. दुसऱ्या दाव्यात असे म्हटले आहे की व्हेनिस येथील लिनारोनी या गावकऱ्याने १५६३ मध्ये टॅनर व्हायोलिन तयार केले. दोन इटालियन कलाकारांनी त्यास नवीन स्वरूप देण्यासाठी अतिरिक्त वैशिष्ट्ये जोडून मूळच्या आधारावर सुधारित केले. काही जण असा दावा करतात की हा जर्मन शोध होता. अशा प्रकारे व्हायोलिनबद्दल अनेक मते आहेत. काहीही असले तरी, एखाद्याने फक्त हे स्वीकारले पाहिजे की हे वाद्य त्याच्या समकालीन स्वरूपात विचित्र आहे. भारतात विशेषतः दक्षिण भारतात त्याचा अधिकाधिक प्रचार केला जात आहे. चांगले व्हायोलिन वादक आता या भागात मोठ्या प्रमाणावर आहेत. इंस्ट्रुमेंटल अवयव- व्हायोलिन- बेलामध्ये सहा प्राथमिक अवयव असतात, ध्वनी म्हणजे शरीर. याला बेली असेही म्हणतात. व्हायोलिनचे शरीर म्हणून त्याचा विचार केला तर, आतील खांबामुळे फिंगर- फिंगर बोर्ड- बोटांच्या टोकांचा वापर करून आवाज पुनर्प्राप्त केले जातात. शेपटीचा तुकडा- ज्याला चार छिद्रे आहेत, हा एक घटक आहे. या चार छिद्रांतून चार तारा खुट्यांना जोडतात. एंड पिन- त्यात टेलपीस घातला आहे. ब्रिज- त्याच्या शिखरावरून तारा खुटींकडे धावतात. ध्वनी पोस्ट- हा घटक पुलाच्या खाली व्हायोलिनच्या आत स्थित आहे. इंस्ट्रुमेंटल व्हायोलिन पद्धतः व्हायोलिनच्या चार तारा आणि त्यांचे मिश्रण करण्याचे तंत्र- व्हायोलिनमध्ये एकूण चार तारा असतात, ज्यांना इंग्रजीत जी, डी, ए आणि ई (जीडीएई.) असे संबोधले जाते. मिश्रणाचे विविध प्रकार आहेत- पहिला प्रकार की, हे घटक एकत्र मिसळले जातात. उदाहरणार्थ- मंद्राचा पंचम, अष्टकाचा पंचम, पंचम आणि अष्टकांचा तार आणि सप्तक. दुसऱ्या श्रेणीतील स्टिल अशा प्रकारे एकत्र केले जातात. दुसऱ्या शब्दांत, सुरुवातीच्या दोन तारा मंद्राच्या पाचव्या- नोट षड्यंत्रात आहेत, तर शेवटच्या दोन तारा मध्य अष्टकच्या पाचव्या- नोट केंद्रात आहेत. तो अशा प्रकारे तिसरा प्रकार मिश्रित करतो. भारतात या तिसऱ्या श्रेणीचा सर्वाधिक प्रसार आहे.

# तुझे जीवन की डोर से बांध लिया है...

आधुनिक केसरी

**सदासतेज देव आनंद आणि साधना ही मनाला खरोखरच आनंद देणारी जोडी `नवकेतन'च्या `हम दोनो' (१९६१) चित्रपटात चमकली होती. १९६२ सालच्या हृषिकेष मुखर्जीदिग्दर्शित असली नकली या चित्रपटात ते दोघे पुन्हा एकत्र आले. या चित्रपटात नझीर हुसेन, संध्या रॉय, मुकरी, लीला चिटणीस, इंदिरा, अन्वर हुसेन, केश्तो मुखर्जी, हरी शिवदासानी, पोलसन आदी सहकलावंत होते. गीते शैलेंद्र आणि हसरत जयपुरी यांनी लिहिली होती. संगीत शंकर-जयकिशनद्वयीने दिले होते.**

या चित्रपटात दाखविल्याप्रमाणे आनंद (देव आनंद) हा धनाढ्य व्यावसायिक राय बहादूर द्वारकादास (नझीर हुसेन) यांचा बिघडलेला नातू. एका श्रीमंत व्यक्तीची एकुलती एक कन्या रेखाशी (इंदिरा) आनंदने विवाह करावा, ही त्यांची इच्छा ; पण आनंदला रेखात काहीही रस नसतो. यावरून दोघांत हमरीतुमरी होते आणि आनंद स्वतःच्या कर्तृत्वावर नोकरी मिळवण्यासाठी आजोबांचे घर सोडतो. मोहन (अन्वर हुसेन) या तरुणाच्या तो दृष्टीस पडतो. मोहन त्याला आपल्या गरिबांच्या वस्तीत घेऊन येतो. आनंद त्याच्याकडे तात्पुरता राहतो आणि काम शोधण्याचा प्रयत्न करतो. त्याची रेणू (साधना) या सुशिक्षित तरुणीशी ओळख होते. तीही त्याला काम शोधण्यास मदत करते. त्याला काम मिळते; पण त्याच्या असमर्थतेमुळे त्याला ते गमवावे लागते.

रेणू एका छोट्या कंपनीत नोकरी करते. वडील पैसे पाठवितात असे ती आईला खोटेच सांगते. आनंद तिला याबद्दल विचारतो तेव्हा ती त्याला सांगते, की आपले वडील हयात नाहीत आणि आई हा धक्का



सहन करू शकणार नाही. आनंद तिचा हात मागतो. ती आनंदाने तयार होते. द्वारकादास आनंदला भेटून रेणूला विसर आणि रेखाशी लग्न कर असे त्याला सांगतात. तो नकार देतो. द्वारकादास रेणूला म्हणतात, की तू अन्य कोणाशी लग्न केले नाहीस तर मी तुझ्या आईला तुझे वडील हयात नाहीत हे सांगेन. निरुपाय म्हणून रेणू आनंदला मला विसरून जा असे सांगते; पण रेणूची आई ते ऐकते व आपले पती हयात नसल्याचे तिला समजते. ती परिस्थितीचा स्वीकार करून रेणूला तिच्या इच्छेनुसार लग्न करण्याची अनुमती देते. द्वारकादासही तिचा स्वीकार करतात. या चित्रपटातील “तुझे जीवन की डोर से बांध लिया है” हे मोहम्मद रफी आणि लता मंगेशकर यांनी गायिलेले सुश्राव्य प्रणयगीत आनंद (देव आनंद) आणि रेणू (साधना) या प्रणयी युगुलावर बोरिवली उपनगरातील पूर्वीच्या राष्ट्रीय उद्यानात (आता राजीव गांधी उद्यान) चित्रित झाले आहे. चित्रपट कृष्ण-धवल असला तरी दिग्दर्शक हृषिकेष मुखर्जी यांनी केलेले गीताचे चित्रीकरण आजच्या रंगीत युगातही ताजेतवाने वाटते. दोघेही एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडाले आहेत. तो तिला म्हणतो, मी तुला जीवनाच्या धाग्याने बांधले आहे; तुझ्याकडून झालेला अन्याय-गहजब आता मला शिरसावंद्य आहे. यावर ती म्हणते, मी तुला प्रेमाच्या बदल्यात प्रेमच दिले आहे. तुझा आनंद-दुःख सगळे मला शिरसावंद्य आहे. हसरत जयपुरीं यांनी हे छान शब्दात मांडले आहे. शंकर-जयकिशन यांची चाल आकर्षक आहे. त्यांनी गीतात ग्रुप व्हायोलिन, गिटार, मेंडोलिन यांचा वापर केला आहे. या गीताच्या ओळी पुढीलप्रमाणे :

**तुझे जीवन की डोर से बांध लिया है
तेरे जुल्मो-सितम सर आंखों पर
मैने बदले में प्यार के प्यार दिया है
तेरी खुशियां और गम सर आंखों पर
अप्सरा कोई आए तो देखू नहीं
कोई बहकाए हसके तो बहकू नहीं
तोरे मतवारे नैनों ने जादू किया
तेरी उल्फत सनम सर आंखों पर
मेरे जीवन की अनमिट कहानी है तू
मेरी तकदीर और जिंदगानी है तू
लिए फिरते हैं सबसे छुपाए हुए
तेरी तसवीर हम सर आंखों पर
चांद सूरज भी हैं तेरी परछाइयां
तुझसे रोशन हुई दिल की गहराइयां
तेरे चेहरे की झिलमिल से मंजिल मिली
ऐसी प्यारी पूनम सर आंखों पर**

अनिल तोरणे
तळेगाव दाभाडे, पुणे

# सरसतेचा दीपस्तंभ : बाळासाहेब देवरस



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**पुणे येथील वसंत व्याख्यानमालेत बाळासाहेब देवरस यांनी समरसतेचा विचार मांडला. त्यांनी रास्वसंघाला लोकाभिमुख केले. सेवाभारती प्रकल्पाद्वारे दिनदलितांची मनोभावे सेवा आरंभीली. स्वदेशी जागरण मंच हा आत्मनिर्भर भारताचा मंत्र दिला. नुकतीच 11 डिसेंबर रोजी त्यांची जयंती झाली. या निमित्ताने लेखकाने पुणे येथे सावरकर प्रभात शाखेवर दिलेल्या व्याख्यानावर आधारित लेख. हिंदुत्व हेच राष्ट्रियत्व हे प.पू.डॉ. हेडगेवारांनी घालून दिलेले सूत्र गोळवलकर गुरुजींनी द्वितीय सरसंघचालक या नात्याने निष्ठेने प्रस्थापित केले आणि संघकार्याचा विस्तार विविध सेवाभावी संघटनांच्या रूपाने देशाच्या कानाकोपऱ्यात सर्वदूर पसरविला.**

त्यांचा वसा तेवढ्याच निष्ठेने पुढे चालवण्याचे कार्य धुकर दत्तात्रय उर्फ बाळासाहेब देवरस यांनी प्रभावीपणे केले. त्यांनी हिंदुत्वाला सरसता सिद्धांताची जोड दिली आणि देशातील दुर्ग आदिवासी ग्रीण भागातील दुःखी कष्टी शोषित सर्व जाती-जातींधील माणसांपर्यंत संघकार्य पोहोचवण्याचा बाळासाहेब देवरस यांचा सिंहाचा वाटा होता. तिसरे सरसंघचालक या नात्याने त्यांनी 1973 ते 1993 या दोन दशकात उक्तीने आणि कृतीने हे सरसतेचे सूत्र प्रत्यक्ष जीवन-व्यवहारात आणले आणि संघावर होणाऱ्या सर्व पूर्व-ग्रहांना व आरोपांना सरसतेच्या ाध्यातून चोख प्रत्त्युत्तर दिले. एक निष्ठावान कार्यकर्ता, सेवाभावी वकील, प्रभावी वक्ता तसेच कुशल संघटक अशी बाळासाहेबांच्या जीवनकार्याची त्रिविध रूपे होती. त्यांच्या साािजक चिंतनातून आणि प्रत्यक्ष संघकार्याच्या अनुभवांतून त्यांनी सरसतेचे दर्शन विकसीत केले आणि साािजक सरसतेचा सिद्धांत संघाच्या विविध कार्याच्या ाध्यातून प्रत्यक्ष कृतीत आणला. सरसता हे त्यांनी दिलेले योगदान केवळ संघापूरतेच र्यादित राहिले नाही तर सबंध भारतीय साजशास्त्रात त्यांनी घडविलेला तो एक चत्कार होता.

**लौलिक जीवनपट :**
बाळासाहेब देवरस यांचे संपूर्ण नाव धुकर दत्तात्रेय देवरस असे होते. त्यांचा जन् देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण कुटुंबात 11 डिसेंबर 1915 रोजी नागपूर येथे झाला. ाणसाचा जन् कोठे होतो यापेक्षा त्याचे कर्तृत्व कसे ुलते याला चरित्रकारांनी हत्त्व दिले आहे. ते हाराष्ट्रात जन्ले परंतु आंध्रप्रदेशात वाढले. संघाच्या सर्व संस्थापकांचे एक वैशिष्ट्य असे आहे की त्यांचे जीवन म्हणजे राष्ट्रीय एकात्तेचा आविष्कार होय. डॉक्टर हेडगेवारांचा जसा आंध्रप्रदेशाशी संबंध आला तसा बाळासाहेबांचा पण आला. त्यांचे वडील दत्तात्रेय कृष्णराव देवरस आणि ातोश्री पार्वतीबाई यांचे ते आठवे अपत्य होते. नववे पुत्र, त्यांचा धाकटा भाऊ, भाऊराव देवरस यानेही संघकार्याच्या विस्तारात ोठे कार्य केले. बाळासाहेब देवरस यांनी बालपणीच संघात प्रवेश करून 'एक आदर्श स्वयंसेवक' असा ठसा उटविला. डॉ.हेडगेवार यांचा त्यांनी आत्विश्वास संपादन केले आणि संघाने त्यांच्यावर टाकलेल्या सर्व जबाबदाऱ्या त्यांनी उत्त प्रकारे पेलल्या. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून भाऊराव देवरस यांनी उत्तरप्रदेशात गावोगावी संघकार्याचा विस्तार केला. लखनौ विद्यापीठात भाऊराव देवरस प्रवेशद्वार त्यांच्या कार्याची साक्ष देते. बाळासाहेब देवरस हे नागपूरच्या न्यू इंग्लिश हायस्कूलचे विद्यार्थी होते. त्यांनी विद्यार्थी दशेत वर्क्तृत्व, लेखन, नेतृत्व गुणांचा विकास केला. 1938 ध्ये त्यांच्या जीवनाला कलाटणी ळिाली. 1934 ते 1938 ह्या काळात त्यांनी नागपूर येथील ॉरीस कॉलेजध्ये शिक्षण घेतले आणि नागपूर विद्यापीठाची पदवी संपादन केली. पुढे त्यांनी आपले जीवन घडवण्यासाठी कायदा (विधी) ही ज्ञानशाखा निवडली आणि नागपूर विद्यापीठाच्या तत्कालीन नाािकत लॉ कॉलेजध्ये प्रवेश घेतला. हे हाविद्यालय दर्जेदार कायदा-शिक्षणासाठी ानले जात होते. तेथील प्राध्यापक-वर्ग आणि पाहुणे व्याख्याता असलेले व्यावसायिक वकील यांचा ोठा दबदबा होता. बाळासाहेब देवरसांनी तेथून एल.एल.बी. ची पदवी अव्वल गुण घेऊन संपादन केली. शिकत असताना कायद्यातील अनेक कूट प्रश्नांवर ते चर्चा, समेलने यात हिरीरीने भाग घेत असत व आपला राष्ट्रीय दृष्टीकोन ठासून ांडत असत. एवढा चुणूकदार आणि नेतृत्वगुण असलेला तरूण डॉ.केशव बळीरा हेडगेवार यांच्या संपर्कात आला आणि त्यांनी डॉक्टरांच्या प्रेरणेने संघकार्यास प्रारंभ केला. शालेय व हाविद्यालयीन जीवनापासून ते संघकार्याशी घनिष्टपणे जोडले गेले. 'संघकार्य हेच जीवनकार्य आहे' आणि संघाच्या ाध्यातून साजाची सेवा करणे हेच आपले कर्तव्य आहे; हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व ह्या ध्येयाच्या सिद्धीसाठी सपर्पित होण्याचा त्यांनी नोन निर्णय घेतला.

**बंगालातील पहिले प्रचारक :**
आरंभीच्या काळात संघाचा विचार देशात सर्वदूर पोहचविण्यासाठी तरूण तडदार प्रचारकांची गरज होती. बाळासाहेबांची जिद्द, र्ूडी आणि त्यांचा उत्साह पाहून डॉक्टरांनी त्यांना बंगालध्ये पाठविण्याचा निर्णय घेतला आणि ते कलकत्ता नगरीत पोहोचले. तेथील संघकार्याच्या विस्तारात देवरसांनी बजावलेले कार्य स्पृहणीय होते. तरूण, व्यवसायिक, ध्यवर्गीय या सर्वांना संघकार्यात जोडण्यात त्यांची हातोटी अद्भूत होती. बैठका, सभासमेलने आणि प्रत्यक्ष सेवा कार्यांतून बाळासाहेबांनी बंगाल प्रांत ढवळून काढला. या काळात त्यांच्या चरित्रातील काही अद्भूत प्रसंग सांगितले जातात. एकदा शिबीराचे नियोजन करताना अनेक अडचणी येत होत्या, परंतु स्वतः असाध्य त्या गोष्टी साध्य करण्यासाठी सर्पित भावनेने कार्य करून त्यांनी कलकत्ता नगरीतील कार्यकर्त्यांवर विलक्षण छाप पाडली होती. 'आधी केले ग सांगितले' असे त्यांच्या कार्याचे सूत्र होते. बंगालातील या रचनात्क कार्यानंतर त्यांच्यावर पुढे संघाची प्रकाशने भक्कपण चालवण्यासाठी जबाबदारी सोपवण्यात आली. नागपूर येथून 'तरूण भारत' हे राठी दैनिक आणि 'युगर्ध' हे हिंदी दैनिक प्रकाशित करण्याचा संकल्प करण्यात आला. या ध्येयवादी प्रकाशनांच्या उभारणीसाठी ुख्य संघटक म्हणून बाळासाहेब देवरसांना परत नागपूरला निंत्रित करण्यात आले. 'तरूण भारत' ची आरंभीची बैठक देवरसांच्या संकल्पनेतून सिद्ध झाली. या वृत्तपत्राला स्थैर्य व बळकटी देण्यात त्यांचा हत्त्वाचा वाटा होता. 'वर्तान पत्र अव्वल दर्जाचे असावे, वेळेवर निघावे आणि साजाच्या सर्व स्तरातील घटना व घडोडींचा वेध त्यात घेतला जावा' अशी त्यांची भूीका होती. पू.डॉक्टरांच्या परीसस्पर्शाने देवरस बंधूंच्या जीवनाचे सोने झाले. दुसरे सरसंघचालक ा.गोळवलकर गुरूजी यांच्या सवेतही त्यांनी अनेक हत्त्वाची को पार पाडली. या काळात देवरस यांनी आपल्या चळवळीच्या वर्तान स्थितीबद्दल व उज्ज्वल भविष्याबद्दल ौलिक चिंतन आरंभले. 1953 ते 57 या काळात त्यांनी प्रत्यक्ष कार्यापासून दूर राहून सेवाकार्यात अधिक रस घेतला. परंतु ते संघटनेच्या सदैव संपर्कात राहिले आणि संघकार्य बहुजनांपर्यंत पोहचविण्यासाठी काय करता येईल?, कोणत्या दिशेने का करावे लागेल याबद्दल त्यांनी ूलगाी चिंतन केले. पू.गुरुजींच्या सूचनेनुसार देवरस बंधुंनी पुन्हा झपाट्याने आणि उत्साहाने संघकार्यास प्रारंभ केला. 1965 ध्ये बाळासाहेब देवरस यांच्यावर 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह' असे दायित्व सोपविण्यात आले. त्याचवर्षी त्यांनी भारतीय जनसंघाच्या वार्षिक सभेला संबोधित केले होते. देवरसांचे हे भाषण जनसंघाला लोकाभिुख करण्यासाठी नवी दृष्टी देणारे होते. क्रेझ बेक्स्टर या प्राध्यापकाने 'द जनसंघ' या ग्रंथात म्हटल्याप्रमाणे स्वतंत्र व्यक्तित्व लाभलेली, पर्यायी राजकीय संस्कृती देणारी संघटना म्हणून 'भारतीय जनसंघा'ची सर्व दार संघाच्या निष्ठावान कार्यकर्त्यांवर व ठोस सिद्धांतावर होती. पू.देवरसांचे जनसंघाला दिशा देणारे हे भाषण, कार्यकर्त्याने साान्य जनतेच्या सुखदुःखाशी का व कसे सरस व्हावे याचे सूत्रकथन करणारे होते. या काळात



देशात सर्वदूर प्रवास करून बाळासाहेब देवरस यांनी संघकार्यात नवचैतन्य आणले. संघावर होणाऱ्या प्रतिगाी कालबाह्य विचारांच्या पुरस्काराची टीका त्यांनी सर्थपणे परतवून लावली आणि संघाचे हिंदुत्व हे पुनरूज्जीवनवादी नसून ते साजप्रबोधनाच्या प्रक्रियांना गती देणारे आहे, अडकून पडलेले प्रगतीचे प्रवाह खुले करणारे आहे हे त्यांनी प्रकर्षाने ांडले. संघाची सरसता ही वैदिक, बौद्ध, जैन व शीख तत्वज्ञानाचा एकत्र आविष्कार करणारी असून ती भारताच्या राष्ट्रीय प्रवाहास बळकटी देणारी आहे हे त्यांनी प्राुख्याने नूद केले.

**तिसरे सरसंघचालक :** प.पू.स.गोळवलकर गुरूजी यांनी आपल्या आध्यात्कि व सांस्कृतिक राष्ट्रवादातून संघाला यशशिखरावर पोहचवले. 'विचारधन' (र्ूडीपलह े ष ोंहीसहीी) हा त्यांचा ग्रंथ निखळ आध्यात्कि राष्ट्रवादाची सांस्कृतिक दृष्टी देणारा आहे. राचंद्र गुहा यांनी 'इंडिया आफ्टर गांधी' या ग्रंथात गुरूजींनी आपल्या लेखणी व वाणीतून देशभर संघविचाराचा कसा प्रसार केला व ते कसे आदरणीय बनले याचा विशेष उल्लेख केला आहे. त्यांच्या जीवनावर एक स्वतंत्र प्रकरण दिले आहे. गुरूजींच्या निधनानंतर अर्थातच सरकार्यवाह या नात्याने नियतीने बाळासाहेब देवरसांवर 'सरसंघचालक' पदाची धुरा सांभाळण्याची जबाबदारी येऊन पडली. ती त्यांनी सर्थपणे पेलली. 1973 ते 1993 या वीस वर्षांत बाळासाहेब देवरसांनी देशापुढील साािजक, आर्थिक सस्या; राष्ट्रीय एकात्तेच्या सस्या; या सर्वांचे साक्षेपी आकलन करून संघाच्या भूतकालीन वाटचालींचा, आदर्शांचा आणि ूल्यांचा वर्तानात नवा आविष्कार घडविण्यासाठी 'साािजक सरसता' हे नवे तत्वसूत्र ांडले. सभोवतीचे साािजक वास्तव हे सांगते की, संघ अजूनही तळागाळापर्यंत पोहचविण्याची गरज आहे; साजातील वर्ण-जातींच्या भींती दूर करून सतेच्याही एक पाऊल पुढे टाकणारा सरसतेचा विचार हत्त्वाचा आहे. साािजक कार्यात संघाने सखोलपणे सहभागी होऊन भारतीय साजाच्या सग्र बांधणीत अग्रभागी राहून रचनात्क भूीका पार पाडली पाहिजे असा त्यांचा आग्रही विचार होता. ही सरसता कृतीत आणताना त्यांनी तीन सूत्रांवर भर दिला. सरस साजजीवन, उन्नत सांस्कृतिक अवधारणा आणि गोरगरीबांच्या सुखदुःखात सरस होणारी प्रत्यक्ष आर्थिक कृती. त्यामुळे संघाविषयी असलेले पूर्वग्रह गळून पडले. संघाचे विरोधकही संघाचा गौरव करू लागले.

**अंधारातील प्रकाशपर्व :**
बाळासाहेब सरसंघचालक असताना संघाला दुसऱ्या बंदीस साना करावा लागला. जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखालील लोकचळवळीस संघाने सक्रीय पाठींबा दिला. तेव्हा इंदिरा गांधींच्या सरकारने देशभर आणीबाणी घोषित केली. संघावर बंदी आणण्यात आली. बाळासाहेब देवरस आणि आघाडीच्या सर्व संघकार्यकर्त्यांना देशभर तुरूंगात बंदिस्त करण्यात आले. खुद्द बाळासाहेब देवरस पुणे येथील येरवडा कारागृहात होते. पुढे इंदिरा गांधी यांनी संघकार्याबाबत ाहीती ागवली. ाी ागितली आणि संघावरील बंदी सशर्तपणे उठवली. त्या काळी इंदिराजींसह काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांशी कसा संवाद साधावा याचे, देवरसांचे एक स्वयंभू तंत्र होते; ते विरोधकांचीही ने जिंकत असत. आणीबाणीच्या काळात संघाची जी कोंडी झाली त्यामुळे उलट संघकार्य सर्वदूर पसरले. जयप्रकाश नारायण या काळात असे म्हणाले होते, 'रा.स्व. संघ ही देशभक्तांची संघटना आहे. जर संघाला देशद्रोही ठरवत असाल तर ीही देशद्रोही आहे असे तुम्हाला म्हणावे लागेल.' बाळासाहेब देवरस, नानाजी देशुख, अटलबिहारी वाजपेयी यांनी लोकनायक जयप्रकाशनारायण यांचा एवढा आत्विश्वास संपादन केला होता की पुढे जनसंघ जनता पक्षात विलीन करण्यात आला. आणीबाणीच्या अंधार काळात बाळासाहेबांनी लोकशाही ूल्यांचा प्रकाश दिला आणि देशात जनता पक्षाच्या विजयाचा चत्कार घडून आला. पुढे इंदिरा गांधींच्या हत्येनंतर देशात स्थैर्य व शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून संघाच्या वतीने राजीव गांधी यांच्या नेतृत्वास सकारात्क सहकार्याचे अभीवचन देण्यात आले. ही सुद्धा देवरसांची कूटनीती होती. आर.के. लक्ष्ण यांनी एक व्यंगचित्र काढून 'राजीव गांधी देवरसांना संघाचा प्रणा करत आहेत' असे चित्र रेखाटले होते.

**सरसतेचे अरतत्व :** देवरसांच्या काळात जनता पक्षातून बाहेर पडून अटल बिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी व प्रोद हाजन यांनी भारतीय जनता पक्ष स्थापन केला. तेव्हा प्रतीकूलतेतून वाटचाल करणाऱ्या भारतीय जनता पक्षाला ध्येयवाद, कार्यकर्त्यांचा संच आणि नवा विकास कार्यक्र देण्यास देवरसांचे ौलिक ार्गदर्शन होते. त्यांच्या सरसतेतून जे वातावरण तयार झाले, त्याचा ायदा भारतीय जनता पक्षाला आरंभीच्या काळात भक्कपणे प्राप्त झाला. सरसता हे सर्व स्तरातील सर्व नागरीकांना जोडणारे तत्वज्ञान आहे. जातीपंथाच्या भिंती दूर करून संघस्वयंसेवक साािजक कार्यात अग्रेसर राहतील; सहभागी होतील आणि प्रत्यक्ष कृतीने परस्पर संपर्काची प्रक्रीया अधिक गतीान करतील असे त्यांनी आवाहन केले. त्यांच्या सरसतेचा सार्वजनिक संस्कृतीवर प्रभाव पडला. संघाने सरसता ंच, सरसता साहित्य समेलन अशा अनेक उपक्रांतून तळागाळातील ाणसे जोडण्याचा कार्यक्र प्रत्यक्षात कृतीत आणला. अविश्रांत परिश्रांुळे प्रकृती अस्वास्थ्य लक्षात घेऊन बाळासाहेबांनी आपल्या कार्याची धुरा प्रा.राजेंद्रसिंह यांच्याकडे सोपवली.डॉ.हेडगेवारांच्या हिंदुत्व तत्वज्ञानाचे पहिले अनुयायी म्हणून त्यांनी जोपासलेले सरसतेचे तत्वज्ञान इतिहासाला कलाटणी देणारे ठरले.

**योगदान :**
आम्ही एक संस्कृती आणि एक राष्ट्र म्हणून हिंदुत्वावर विश्वास ठेवतो. हिंदुत्वाची आची व्यापक, सर्वसावेशक आहे, सर्वांना सरस करणारी आहे, असे ते आग्रहाने प्रतिपादन करीत असत. त्यांचा सरसता विचार हा अगदी अल्पसंख्याक ुस्लीांपर्यंत पोहोचणारा होता. गांधीजींनी अल्पसंख्याकासाठी ौलीक कार्य केले परंतु दुर्दैवाने गांधीजे तत्ज्ञान त्यांनी स्वीकारले नाही. संघाच्या हिंदुत्वविचारांचा प्रसार अल्पसंख्याक वर्गात करावा अशी बाळासाहेबांनी प्रथ दृष्टी दिली. भारतीय साजातील कनीष्ट प्रथा, रूढी, अंधश्रद्धा दूर करण्यावर बाळासाहेबांनी भर दिला. संघाच्या शिक्षणसंस्था, शाळा, हाविद्यालये यातून त्यांनी सरसतेचे धडे देण्याचा आग्रह धरला. 'स्वरूपवर्धिनी' सारखे सेवाकार्य त्यांनी अगदी उपेक्षित वसाहतींध्ये सुद्धा निष्ठेने चालवण्याचा आग्रह धरला व तो कृतीत आणला. दि. 9 नोव्हेंबर 1985 रोजी ते म्हणाले होते, ''हिंदुंची एकता हे आचे ध्येय आहे. परंतु आचा असा विश्वास आले की, भारतातील सर्व नागरीकांना सरस करणारी हिंदू संस्कृती आम्ही विकसीत केली पाहिजे.'' स्वदेशी जागरण ंच, सरसता ंच यांसारख्या कार्यातून त्यांनी आपल्या ठोस भूीका ांडल्या. आर्थिक उदारीकरणाविरुद्ध स्वदेशी व आत्निर्भर भारताचा विचार त्यांनी बोलून दाखवला. देवरस यांच्या ग्रंथरचनाही त्यांच्या विचारांचे दर्शन घडवतात. 'साािजक सता आणि हिंदू एकत्रिकरण' (1974); 'पंजाब सस्या व त्याचे निराकरण' (1984); 'हिंदू संघटन आणि सत्तावादी राजनीती' (1997); 'देवरस यांची प्रश्नोत्तरे' (1984); हे त्यांचे ग्रंथ हत्त्वाचे आहेत. इंग्रजीतील त्यांचा 'द पॉवर ऑ गुड' (1975) चांगल्या रचनात्क कार्याची शक्ती स्पष्ट करणारा आहे. त्यांच्या ग्रंथांच्या अंभ्यासावरून अस्खलीत राठी, ठोस हिंदी आणि टोकदार इंग्रजी भाषेच्या ांडणीची प्रचीती येते.

**सारोप :** देवरस यांच्या तत्त्वज्ञानावर आधारीत 'हिंदू र्धाचे संस्करण' हा ग्रंथ आल्बानी स्टेट युनिव्हर्सिटी, न्यूयॉर्क विद्यापीठाने 2007 साली प्रकाशीत केला आहे. राजगोपाल अरविंद यांनी केंब्रीज विद्यापीठाच्या वतीने प्रकाशीत ग्रंथाध्ये त्यांच्या राष्ट्रवादी राजकारणाची ीांसा आली आहे. चेतन भट यांच्या 'ूळ विचारधारा आणि आधुनिक थिक' या ग्रंथातही देवरसांचे कार्य चर्चिले आहे. जा्रे लॉट ख्रिस्टॉ यांनीही हिंदू राष्ट्रवादावरील प्रिंन्स्टन विद्यापीठाच्या वतीने लिहिलेल्या ग्रंथात त्यांच्या राष्ट्रवादी विचारांचा आढावा घेतला आहे. योगेंद्र सिंग, अरविंद र्शा, संतोष साही यांच्या ग्रंथातूनही देवरसांच्या कार्याची हती आली आहे. देवरसांच्या सरसता कार्याचे श्रेष्ठत्व सांगताना नवहिंदुत्व विचार असेही सरसतेचे वर्णन केले जाते. भारतीय साजातील वर्चस्व कल्पनांना छेद देऊन संविधानातील स्वातंत्र्य, सता, बंधुता व साािजक न्याय या कल्पनांशी जोडण्याचे ऐतिहासिक कार्य बाळासाहेबांनी केले. त्यामुळे हिंदू राजकारणाचे साािजकरण होऊन संघकार्य भारतातील खेडी, वनवासी, आदिवासी या व र्गांपर्यंत पोहोचले. हेच देवरसांच्या सरसतेचे खरे योगदान होय. 21व्या शतकात बलशाली भारताची उभारणी करण्यात देवरसांनी उक्ती व कृतीतून दिलेले योगदान भारताच्या अभ्युदयास प्रेरक ठरले आहे यात शंका नाही.

# सखाराम महाराजांच्या जयघोषाने आसमंत दणाणला; भाविकांनी घेतला महाप्रसाद

आधुनिक केसरी न्यूज



**वसंत पाटील**


**वाशिम :** संत सखाराम महाराजांच्या पुण्यतिथी निमित्त दरवर्षी रिसोड तालुक्यातील लोणी बू. येथे भव्य यात्रा भरत असते. याहीवर्षी दि.१२ डिसेंबर मंगळवार रोजी संत सखाराम महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. त्याअनुषंगाने तब्बल १०१ क्विंटलच्या विवीध खाद्यपदार्थापासून बनवलेल्या मिष्टान्न महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. विदर्भ, मराठवाड्यातून आलेल्या असंख्य भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेउन श्रींचे दर्शन घेतले. दरम्यान गावातून काढण्यात आलेल्या पालखी सोहळ्यात भाविकांच्या जयघोषाने आसमंत दणाणून गेला होता. वाशिम जिल्ह्यातील सर्वात मोठी यात्रा असलेल्या लोणी येथे दरवर्षी विदर्भ, मराठवाड्यातून हजारो भाविक येत असतात. सतत १५ दिवस चालणाऱ्या यात्रेत दररोज येणाऱ्या भाविकांसाठी पुरीचा ( रोट ) प्रसाद दिला जातो. सदर प्रसाद घरातील साठवलेल्या धान्यात ठेवल्यास बरकत येवून कधीच अन्नाची कमी पडत नाही, अशी येथे येणाऱ्या असंख्य भाविकांची श्रद्धा आहे. यात्रेच्या निमित्ताने विवीध साहित्यांची दुकाने, मनोरंजनाची साधने व इतर लहान,मोठे व्यवसायिक सहभागी होत असतात. परिणामी यात्रेत लाखो रुपयांची उलाढाल होत असते. विदर्भ - मराठवाड्याच्या सीमेवर जगप्रसिध्द लोणार सरोवरा जवळ असलेले वाशीम जिल्ल्यातील एक गांव लोणी. श्री सखाराम महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली लोणी संपुर्ण महाराष्ट्रात सखाराम महाराजांची लोणी म्हणून ओळखली जाते श्री. सखाराम महाराजीचा जन्म मराठवाड्यानीक परभणी जिल्हयातील तळणी येथे डि-9 एप्रील 1786 रोजी रामनवमीला झाला.त्यांनी लोणी येथे कार्तीक वद्य चतुदशीला दि 23 नाव्हेंबर 1878 रोजी समाधी घेतली. तेव्हा पासुन त्यांच्या पुण्यतिथीला लोणी येथे यात्रा भरते ही यात्रा लोणी यात्रा म्हणून प्रसिद्ध आहे. बालपणा पासुनच सखाराम महाराज ईश्वर भक्तीमध्ये रमत आले,सकाळी उठुन गायीचे दर्शन, देवीचे ध्यान,गणपतीचे पुजन अर्चन,याचा त्यांना ध्यास होता. ववयाच्या सातव्या वर्षी शके 1715 माघ कृ.पंचमी दि 22 फेब्रुवारी 1794 रोजी त्यांचा व्रतबंध विधी झाला.त्याचवर्षी वेदशास्त्राचे अध्ययन करण्यासाठी वाशीम येथील पंडीत बाळशास्त्री यांचेकडे त्यांना ठेवण्यात आले. त्यांनी 160 श्लोकांचा मुहुर्तमार्तंड हा ग्रंथ एकाच दिवसान मुखोद्गगत केला, त्यांची कुशाग्र बुद्धी पाहुन बाळशास्त्री स्मित झाले.त्यांचा विरोध आसतांनी देखील दि-21 डिसेंबर 1800 रोजी त्यांचा विवाह तळणी येथील आप्पा वायकर यांची मुलगी सरस्वती यांच्याशी लावून देण्यात आला. पण त्याच दिवशी ने गृहत्याग करून तपश्चर्येसाठी निघुन गेले. त्यांनी वाशीम येथील पद्मतीर्थ तलाव,रिसोडे येथील पिंगलाक्षीदेवी,लोणार येथील कमळजादेवी-जवळ तपसाधना केली.त्यानंतर ने काशीला गेले. तेथे गंगेच्या काठावर जलस्तंभ योगाद्वारे14 वर्षे तपसाधना केली. त्या नंतर लोणी येथे आले व येथेच समाधिस्थ झाले. तेंव्हापासून त्यांच्या पुण्यतिथी निमित्त दरवर्षी मोठी यात्रा भरत असते.

# माता महाकाली मंदिराचा सर्वसमावेशक विकास करा

## आ. किशोर जोरगेवार : पुरातत्व विभागाच्या जाचक अटी दूर करण्याची हिवाळी अधिवेशनात मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदिराच्या विकासासाठी 40 कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. असच एक शक्तीपीठ चंद्रपूर देखील असुन माता महाकालीच्या या मंदिराला देशभरातील लाखो भाविक या महाकांली मातेच्या दर्शनाला येतात असतात. त्यामुळे या मंदिराच्या विकासासाठी सुद्धा शासनाने पूढाकार घ्यावा अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी हिवाळी अधिवेशनात केली असून मंदिराच्या विकासकामात अडथळा असलेल्या पूरातत्व विभागाच्या जाचक अटींकडेही यावेळी



आमदार किशोर जोरगेवार यांनी सभागृहाचे लक्ष वेधले आहे. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या तिस-या दिवशी पूरवणी मागणीवर बोलतांना आमदार किशोर जोरगेवार यांनी पून्हा एकदा माता महाकाली मंदिराच्या विकासाचा मुद्दा सभागृहात उचलला. यावेळी बोलताना आमदार किशोर जोरगेवार म्हणाले कि, चंद्रपूरात माता महाकाली मंदिराचे 500 वर्ष पूरातन मंदिर आहे. तर 2 हजार वर्षा पुर्वीची येथे माता महाकालीची मुर्ती आहे. या शक्तीपीठात चंद्रपूर नव्हे तर देशभरातून वर्षभर लाखो भाविक दर्शनाला येत असतात. मात्र पूरातत्व विभागाच्या अटिमुळे या मंदिराचा विकास झालेला नाही. महाविकास आघाडी सरकारने दिलेले 59 कोटी रुपये अखर्चित आहे. पैसे असुनही केवळ पूरातत्व विभागाच्या जाचक अटिंमुळे या मंदिराच्या विकासकामात अडथळा निर्माण होत असल्याचे ते यावेळी म्हणाले. सोबतच महाकाली यात्रा परिसरात अनेक मोकळ्या जागा आहेत मुख्यमंत्री यांनी स्वतंत्र बैठक घेत हा यात्रा परिसर विकसित करावा अशी मागणी यावेळी बोलतांना त्यांनी केली. महानगर पालिका आणि नगर पालीका क्षेत्रात पायाभुत सुविधा उपलब्ध करण्यासाठी 700 कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद शासनाच्या वतीने करण्यात आली आहे. या विभागातून चंद्रपूर महानगर पालिका आणि नवनिर्मित घुग्घूस नगर परिषद साठी शासनाने निधी दयावा तसेच वैशिष्टपूर्ण विभागात दोनशे कोटी रुपयांना निधी आहे. यातुनही चंद्रपूरच्या विकासासाठी निधी देण्यात यावा अशी मागणी यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी अधिवेशनात बोलताना केली आहे. नागपूर करीता अतिवृष्टीसाठी सरकारने 100 कोटी रुपये राखीव केले आहे. चंद्रपूरातही अतिवृष्टी झाली आहे. त्यामुळे येथे चारदा पूर आला परिणामी अनेक भागातील पायाभूत सुविधा पूर्णपणे खराब झाल्यात त्यामुळे चंद्रपूरात सुद्धा आपण निधी द्यावा अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय चंद्रपूरात मंजूर झाले आहे. या विद्यालयाची इमारत तयार होत आहे. सध्या सदर मेडीकल कॉलेज जिल्हा सामान्य रुग्णालयात सुरु आहे. त्यामुळे आरोग्य व्यवस्थेवर ताण निर्माण होत आहे. ही बाब लक्षात घेता चंद्रपूर येथील शासकीय वैद्यकिय महाविद्यालयात पदभरती करुन ते नव्या इमारतीत सुरु करण्यात यावे अशी मागणी यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी अधिवेशनात केली आहे.



# हिरे मेडिकलच्या विषयावर मंत्रालयात बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भाऊसाहेब हिरे मेडीकल कॉलेजच्या विविध समस्या सोडविण्यासाठी आ.फारूक शाह यांनी वैद्यकीय शिक्षण मंत्री ना. मा.हसन मुश्रीफ यांचेकडे विशेष बैठक आयोजित करणे बाबत मागणी केली होती.त्यानुसार हिवाळी अधिवेशनाच्या काळात नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात आज दि.१२ डिसेंबर रोजी ना.मा.हसन मुश्रीफ यांचे अध्यक्षतेखाली वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अधिका-यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीत विविध समस्यांवर चर्चा होवून ना. मा.हसन मुश्रीफ यांनी सर्व समस्या तातडीने सोडविण्याचे निर्देश वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. धुळे शहरातील व गुजरात मध्यप्रदेश सिमेला लागून असलेल्या व महामार्ग क्र. ३ व ६ याला लागून असलेल्या हिरे मेडीकल कॉलेज येथे गरीब व अपघात ग्रस्त रुग्णांवर मोठ्या प्रमाणात उपचार होत असतात. परंतु या रुग्णालयात मुलभूत सोयी सुविधांच्या अभावाने तसेच पुरेशा औषध साठा उपलब्ध नसल्याने डॉक्टरांची कमी संख्या तसेच कर्मचारी कमी असल्यामुळे रुग्णांवर योग्य ते उपचार वेळेवर न झाल्यामुळे अनेक रुग्ण दगावले आहे. या रुग्णालयात कायम स्वरुपी अधिष्ठता नसल्यामुळे प्रशासनावर कोणाचीच पकड नसल्यामुळे या रुग्णालयात मोठ्या प्रमाणावर रुग्णाचे हाल होत आहे. प्रसुती विभागात अनेक बालके या पूर्वी दगावलेले आहे. सीटी स्कॅन व एमआरआय माशिन कार्यन्वित नसल्यामुळे अनेक रुग्णांना बाहेरून रिपोर्ट काढून आणावे लागत आहे. तसेच पुरेश्या मनुष्यबळा अभावी संपूर्ण परिसरात घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. या बाबत आ.फारुख शाह यांनी ना.मा. हसन मुश्रीफ यांना भेटून या समस्या बाबत बैठक आयोजित करणे बाबत मागणी केली होती. त्यासंदर्भात हिरे मेडिकल रुग्णालयातील वर्ग ४ ची रिक्त पदे,हाउस कीपिंग,कायम स्वरूपी अधिष्ठाता नेमणूक करणे.C.T.SCAN मशिन आणि M.R.I. मशिन खरेदी करणे या प्रमुख सामस्यांबाबत चर्चा झाली.तातडीने C.T.SCAN मशिन आणि M.R.I. मशिन खरेदी करण्याचे आदेश ना.मा.हसन मुश्रीफ यांनी दिले तसेच भा.हि.शा.वै.महाविद्यालयात तत्काळ कायम स्वरूपी अधिष्ठाता देण्याची मागणी देखील मान्य करण्यात आली असून याबाबतची कार्यवाही तातडीने पार पाडावी असे आदेश देण्यात आले. वर्ग ४ ची रिक्त पदे,हाउस कीपिंग संदर्भात सकारात्मक चर्चा होवून लवकरच मार्ग काढण्याबाबत बैठकीत निर्णय घेण्यात आला.या बैठकीस संचालक वैद्यकीय शिक्षण विभाग,हिर साहेब,आंधळकर साहेब, भा.हि.शा.वै.महाविद्यालयाचे प्रभारी अधिष्ठाता डॉ.अरुण मोरे,अधिक्षक डॉ.पाठक उपस्थित होते. भा.हि.शा.वै. महाविद्यालयाच्या समस्या मार्गी लावल्याबद्दल आ.फारुख शाह यांनी वैद्यकीय शिक्षण मंत्री ना.मा.हसन मुश्रीफ यांचे धुळेकर जन्तेच्यावतीने आभार मानले आहे.

# नादरपूर येथे विकास कामांचा आढावा

## गावात गटविकास अधिकारी ढोकने यांची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ़**

**पिशोर :** कन्नड तालुक्यातिल नादरपूर येथे पंचायत समिती कन्नड येथील मा .गट विकास अधिकारी साहेब व सर्व तालुका स्तरीय विविध विभागाचे विभागप्रमुख त्यात प्रामुख्याने मा.गटविकास अधिकारी श्रीयुत ढोकने ,श्रीयुत कांबळे, डेप्युटी इंजि.सिंचन,श्रीयुत मामीडवार साहेब ता.कृषी अधिकारी ,श्रीयुत कुलकर्णी विस्तार अधिकारी महिला बालकल्याण,श्रीयुत सोळुंके ता.आरोग्य अधिकारी, श्रीयुत एस.डी.चव्हाण साहेब विस्तार अधिकारी पं.कन्नड श्रीयुत दारकुंडे, विस्तार अधिकारी, श्रीयुत घुगे शाखा अभियंता पा.पु.,श्रीयुत खैरनार ता.अधिकारी मग्रारोहयो ,श्रीयुत लहाने साहेब घरकुल विभाग, श्रीयुत मुरमुडे साहेब संगणक ऑपरेटर,श्रीमती डॉ.व्ही.व्ही.शेजुळ सहाय पशुधन विकास अधिकारी व इतर तालुका स्तरीय विभागप्रमुख ह्यांनी नादरपूर मुक्कामी राहून गावच्या सर्वांगीण विकासासाठी कोणकोणत्या योजना राबवायच्या याबाबत माहिती दिली. त्यात मग्रारोहयो योजने अंतर्गत शेतकऱ्यांना लखपती करण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.तसेच रमाई घरकुल योजना,पाणंद रस्ते,सिंचन विहिरी,गायगोठा इ.सुरुअसलेल्या कामाची पाहणी केली. त्यांच्या सोबत सर्व विभागाचे विभागप्रमुख यानी त्यांचे कार्यक्षेत्रात असलेल्या योजनांची सविस्तर माहिती ग्रामस्थांना दिली.तसेच गावात असलेले कलावंत यांनी कलगीतुरा,लोकसंगीत इ.कार्यक्रमाचे प्रात्यक्षिक करून दाखविले.त्यामध्ये मा.गट विकास अधिकारी यांनी बाळ कलाकार,तरुण कलाकार,वयोवृद्ध कलाकार यांचे स्वागत करून कौतुक केले.गावच्या वतीने मा.ग.वि. अधिकारी साहेब यांनी सर्व विभागाचे प्रमुख यांनी त्यांचे गाव विकासा साठी असलेली धडपड पाहून मनापासून आभार मानले. याप्रसंगी गावातील ग्रामस्थ व परिसरातील इतर गावचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते ग्रा.पं.नादरपूर च्या वतीने पत्रकार मंडलीचेही विशेष आभार मानण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रामसेवक श्री एस.आर.बनकर साहेब तर सूत्रसंचालन श्री लक्ष्मण बळी यांनी केले व आभार प्रदर्शन श्रीयुत दिलीप निकम साहेब यांनी केले.





# सेंट ॲन्स स्कूलचा क्रीडा महोत्सव उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** येथील सेंट ॲन्स इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेज चा वार्षिक क्रीडा महोत्सव शनिवार दि. ०९ रोजी प्रमुख अतिथी अपेक्षा दडस व शुभम भोईटे यांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.मुलांना दर्जेदार शिक्षणासोबतच त्यांच्याकडील क्रिडा नैपुण्य खेळाच्या मैदानावर दाखवण्याची संधी उपलब्ध व्हावी या हेतूने दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील लोणंद येथील सेंट ॲन्स इंग्लिश मीडियम स्कूलने वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले होते.यावेळेस प्रमुख पाहुण्या म्हणून किक व्हॉलीबॉल (SEPAKTAKRAW) या खेळाच्या राष्ट्रीय कोच (मुली) अपेक्षा दडस या उपस्थित होत्या. तसेच शुभम भोईटे ( बॉडी बिल्डर, पुणे) खंडाळा तालुका समन्वयक तथा व्हॉलीबॉल राष्ट्रीय मार्गदर्शक चंद्रकांत भोईटे, फादर जोजी जोसेफ, प्रिन्सिपल सिस्टर व्हिन्सी मारिया यांनी स्वागत केले. यावेळेस मॅनेजर चैतन्या तसेच विद्यार्थी,पालक तसेच मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमाची सुरवात सेंट ॲन्सचे हेड बॉय ओम महांगडे व हेड गर्ल ज्योती साहू यांनी प्रमुख पाहुणे व उपस्थित मान्यवर व प्रिन्सिपल यांना घोड्यावरून मानवंदना देत करण्यात आली. यानंतर खेळाचे प्रतीक असलेली मशाल प्रमुख पाहुणे आणि प्रिन्सिपल यांच्या हस्ते प्रज्वलित करण्यात आली. यावेळेस आकाशात रंगबिरंगी फुगे सोडण्यात आले.या स्पर्धेच्या सांगता समारंभ प्रसंगी कमांडो ट्रेनिंग फोर्स शिरवळ यांच्या मार्गदर्शाखाली सेंट ॲन्सच्या विद्यार्थ्यांनी अनेक चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर केली. तसेच विद्यार्थ्यांकडून मल्लखांब मनोरेही उभारण्यात आले. क्रीडा महोत्सवा दरम्यान विविध क्रीडाप्रकारात नैपुण्य दाखवलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदक व प्रशस्तीपत्र देवून सन्मानित करण्यात आले. स्पर्धेचे मुख्य आकर्षण असलेली बेस्ट हाऊस ची ट्रॉफी यावर्षी 'शामरॉक हाऊस' ला प्रदान करण्यात आली. यावेळेस मोठ्या संख्येत विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते. या क्रिडा महोत्सवासाठी क्रीडा शिक्षक निलेश व प्रशांत सर तसेच सर्व शिक्षकवृंदाचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या शेवटी वैशाली टिचर यांनी मान्यवरांचे आभार व्यक्त केले.



# संत ज्ञानेश्वर महाराज समाधी उत्सवाची उत्साहात सांगता

आधुनिक केसरी न्यूज





**पैठण :** संतसम्राट ज्ञानेश्वर माऊलींनी समस्त जिवमात्रांच्या कल्याणासाठी विश्वात्मक ईश्वराकडे प्रार्थनारूपी पसायदान मागितले. आपल्यापुरते पाहणाऱ्यांना व कुपमंडूक वृत्ती लाभलेल्या स्वार्थी मंडळींनी यापासून काहितरी बोध घ्यावा. कारण अशा संतविचारांची आज खरी गरज आहे. असे प्रतिपादन ह.भ.प. ज्ञानेश्वर विष्णू महाराज कोल्हापूरकर यांनी केले. "माऊली" जन्मक्षेत्र आपेगाव येथे संत ज्ञानेश्वर महाराज समाधी उत्सवाची सागंता दहहंडी फोडुन। करण्यात आली

संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या जन्मस्थळी आपेगाव येथे माऊलीचा जयजयकार करीत भाविकानी मंदिरात रांगा लाऊन दर्शन घेतले. या समाधी सोहळ्या निमित्ताने तीन दिवस किरणोत्सव माऊलीच्या मुखकमलावर भाविकांनी याची देही याची डोळा अनुभला या लाखो भाविक यावेळी हजर होते.

कालाहंडी चे किर्तन ह.भ.प.भानुदास महाराज कोल्हापूर यांनी केले. निमित्त दरवर्षी प्रमाणे मोठी यात्रा भरली होती. ज्ञानेश्वर महाराज कोल्हापुरकर यांच्या हस्ते साय; 5/30 वाजता दहीहंडी फोडून काला प्रसादाने माऊलीच्या संजीवन समाधी सोहळ्याची सागंता करण्यात आली. मंदीर संस्थानकडून सप्ताह काळात विवीध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. काल्याच्या किर्तनातून ज्ञानेश्वर विष्णू महाराज कोल्हापूरकर यांनी ज्ञानेश्वर माऊलीचे जीवन चरित्र काल्याच्या किर्तन रूपी सेवेतून सांगितले. यात्रा काळात महाराष्ट्र बँकेतर्फे तसेच गावकर्यातर्फे सकाळपासून नाष्टा चि सोय करण्यात आली होती जिल्हा परीषद अरोग्य विभागातर्फे भाविकासाठी मोफत औषध उपचार करण्यात आला. दरम्यान या वर्षीच्या संजीवन समाधी सोहळ्याच्या समारोप प्रसंगी आज माजी केंद्रीय मंत्री जयसिंहराव गायकवाड, रेणुकादेवी शरद सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन विलासबापु भुमरे,राष्ट्रवादीचे नेते,दत्तात्रय गोर्डे,शिवसेना (उ.बा.ठा) तालुकाध्यक्ष मनोज पेरे, ज्ञानेश्वर कापसे, माजी चेअरमन आप्पासाहेब पाटील, छावा संघटनेचे किशोर शिरवत, किशोर सदावर्ते, विशाल वाघचौरे, आदी ऊपस्थीत होते. माऊलीच्या जन्मभुमीत मोठ्या संख्येने गर्दी उसळली होती. आलेल्या भाविकासाठी मंदीरात आण्णासाहेब औटे,कांतराव औटे,प्रल्हादराव औटे,आशोक औटे,सचिन औटे,प्रा युवराज औटे यांनी महाप्रसादाची सोय करण्यात आली होती. सध्याकाळी संपूर्ण गावात माऊलीची छबिना पालखी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी पैठण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली यात्रा काळात चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## बाजारसावंगी ते धामणगाव रस्त्याची दयनीय अवस्था; जागोजागी खड्डेच खड्डे

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील ग्रामीण भागातील संपर्क असलेला व अत्यंत रहदारीचा नावलौकिक असलेला बाजार सावंगी-रेल-धामणगाव हा रस्ता पाच किलोमीटरचा अत्यंत दयनीय अवस्था व जागो जाग खड्डे असल्याने रहदारीस जिकरीचा ठरतो या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण त्वरित होणे आवश्यक आहे. सदरहू रस्ता खुलताबाद-सुलतानपूर-बाजार सावंगी-धामणगाव-तिसगाव-गल्लेबोरगाव व खुलताबाद अन्य गावांशी रस्त्यांची जोडलेला आहे सार्वजनिक बांधकाम विभागाने मध्यंतरी काही गावअंतर्गत डांबरीकरण रस्ते करून हा रस्ता बनवलेला आहे मात्र या पाच किलोमीटरचा रस्ता जुनाच असल्याने त्याकडे अद्यापही लक्ष दिले गेले नाही म्हणून अवजड वाहने व खडी दगड गोटे वाहतुक याच रस्त्याने मोठ्या प्रमाणात होत असते त्यामुळे तो जागोजाग उघडलेला आहे रेल व धामणगाव डोंगरालगत क्रेशर दगड व खडी डेपो असल्याने मोठी रहदारी असते त्यामुळेही रस्त्याची दुरावस्था झालेली आहे. रेल धामणगाव बाजार सावंगी या ग्रामपंचायतींनी पाठपुरावा करू नये या रस्त्याकडे दुर्लक्ष झालेले दिसून येते त्यामुळे रहदारीला वारंवार अडथळा येतो. रस्त्यावर मोठमोठे खड्डे असल्याने पर्यायी मार्ग शोधावा लागतो बाजार सावंगी लगत अर्धा किलोमीटर आसपासच्या शेतांचे पाणी याच सडकेवरून वाहून नदीला मिळते त्यामुळे अधिक उखळला जातो शालेय विद्यार्थ्यांना रहदारी जड जाते पालकांना सोडून द्यावे लागते. संपूर्ण तालुक्याला व तालुका स्थळांना वडसा घालता येणारा असा हा रस्ता असल्याने नव्याने मजबुतीकरण व डांबरीकरण होणे गरजेचे आहे, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.



## आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने समाजसेवेच्या सर्व क्षेत्रात उत्कृष्ट कार्य व्हावे : मुनगंटीवार

### द सीएसआर जर्नल एक्सलन्स अवॉर्ड २०२३ चे वितरण

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने समाजसेवेच्या सर्वच क्षेत्रात कार्यरत व्यक्ती आणि संस्थांनी उत्कृष्ट कार्य केले पाहिजे, असे प्रतिपादन सांस्कृतिक कार्य, वने, आणि मत्स्यव्यवसाय मंत्री श्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले. केंद्रीय संरक्षण मंत्री श्री राजनाथ सिंह आणि मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते द सीएसआर जर्नल गुड गव्हर्नन्स एक्सलन्स अवॉर्ड स्वीकारताना स्वीकारताना ते बोलत होते.

मुंबईत शनिवारी बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज येथे द सीएसआर जर्नल एक्सलन्स अवॉर्डस् वितरण सोहळा संपन्न झाला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, द सीएसआर जर्नल एक्सलन्सचे अमित उपाध्याय, प्रसिद्ध कवी कुमार विश्वास, माजी केंद्रीय माहिती आयुक्त उदय माहूरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुनगंटीवार पुढे म्हणाले की फार्मर (शेतकरी), फिशरीज (मत्स्य व्यवसाय), आणि फॉरेस्ट (वने) हे फॅमिलीचे (कुटुंबाचे) मोठे आधारस्तंभ आहेत. याच तीन एफ मधून फॅमिली म्हणजे कुटुंबाला अन्न पाणी, वनौषधी, शुद्ध हवा मिळते. त्यामुळे या तीनही क्षेत्रांचे योग्य व उत्कृष्ट संवर्धन करणे गे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. आम्ही त्याकरताच प्रयत्नरत आहोत. सामाजिक क्षेत्रात कार्यरत प्रत्येकाने यात आपले योगदीन अवश्य द्यावे. कॉर्पोरेट क्षेत्राने सीएसआरच्या माध्यमातून या क्षेत्रात आपले योगदान वाढवावे असेही ते म्हणाले. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, समाज, देश आणि राष्ट्राला प्राधान्य देत देशात मोठ्या प्रमाणात सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या विविध संस्था आणि कंपन्या आहेत. यावेळी बोलतांना मुख्यमंत्री श्री एकनीथ शिंदे यांनी श्री सुधीर मुनगंटीवार यांचे विशेष कौतुक केले. मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांस्कृतिक कार्य, वने, आणि मत्स्यव्यवसाय या तीनही क्षेत्रात विविध योजना राबवून अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. लंडन येथील छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखे परत आणण्याचा सामंजस्य करार केला. ५० कोटी झाडांची लागवड करून पर्यावरणाचे रक्षण करण्याचा निर्णय घेतला. त्यांना आज गुड गव्हर्नन्स एक्सलन्स अवॉर्ड या पुरस्कारानी सन्मानित करण्यात येत आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. तसेच खासदार श्रीकांत शिंदे यांनी स्वतःची वेगळीओळख निर्माण केली आहे त्यांना एंबेसडर फॉर सोशल इम्पॅक्ट हा पुरस्कार प्राप्त झाला त्याबद्दल मला वडील म्हणून अभिमान आहे. असे सांगून दुर्गम भागात आदिवासी समाजाच्या कल्याणासाठी सामजिक कार्य करणारे पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे आणि डॉ. स्मिता कोल्हे यांना जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले.

**कॉर्पोरेट क्षेत्राने स्वयंप्रेरणेने देशाच्या उन्नतीसाठी योगदान द्यावे :** सामाजिक जबाबदारी कायदेशीररित्या बंधनकारक असलेल्या कोणत्याही कर भरण्यापेक्षा वेगळी आहे . जेव्हा आपण कोणताही कर भरतो तेव्हा समाज आपल्याशी जोडला जात नाही देशाच्या, समाजाच्या कल्याणासाठी मदत करतो तेव्हा अनेक व्यक्ती, समाज आपल्याशी जोडला जातो . त्यामुळे कॉर्पोरेट क्षेत्राने स्वयंप्रेरणेने देशाच्या उन्नतीसाठी योगदान द्यावे, असे प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केले . केंद्रीय मंत्री सिंह म्हणाले, मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे . परस्पर अवलंबिताची बंधने तोडून राहू शकत नाही . एखाद्या व्यक्तीच्या अडचणीवेळी मदत केली तर मदत करणाऱ्या व्यक्तीकडे किती संपत्ती आहे हे पहिले जात नाही . तर कोणत्या व्यक्तीने तातडीने मदत केली हेच पाहिले जाते . समाजात बंधुत्वाची,आणि मदतीची भावना असायला हवी . जो समाज एकमेकांना मदत करतो तोच समाज देशाला पुढे घेऊन जातो आणि इतरांना पुढे येण्यासाठी सुद्धा प्रेरित करतो .त्यासाठी सामाजिक जाणीव असलेल्या लोकांचे, विशेषत: कॉर्पोरेट्स क्षेत्रातील व्यक्ती, संस्था यांच्या सामजिक योगदानाबद्दल कौतुकच केले पाहिजे, असेही केंद्रीय मंत्री सिंह यांनी यावेळी सांगितले .

## भाजपाच्या वतीने बेनामी संपत्तीच्या प्रकरणी खा. धीरज साहू यांच्या प्रतिमेस जोडे मारो

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** भारतीय जनता पार्टी छत्रपती संभाजीनगर उत्तर ग्रामीण तर्फे काँग्रेस झारखंडचे खासदार धीरज साहू यांच्या घरी बेहिशेबी 350 कोटींहून अधिक रोकड सापडली,म्हणून भ्रष्टाचारी काँग्रेसच्या विरोधात घोषणा देत खासदार साहु व राहुल गांधी यांच्या फोटोला जोडे मारत फुलंब्री येथे आंदोलन करण्यात आले. या प्रसंगी भाजपा जिल्हाध्यक्ष श्री.सुहासभाऊ शिरसाठ, भाजपा महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा सौ.पुष्पाताई प्रकाश काळे, जिल्हा सरचिटणीस सौ.ऐश्वर्याताई अभिषेक पा. गाडेकर, तालुकाध्यक्ष श्री. सांडू आण्णा जाधव, शहराध्यक्ष श्री. योगेश भाऊ मिसाळ, तालुका उपाध्यक्ष श्री. राम मामा बनसोड, महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस सौ.गंगाताई ताठे, छ.संभाजीनगर महिला मोर्चा तालुकाध्यक्षा श्रीमती. सरसाताई वाघ, फुलंब्री महिला मोर्चा तालुकाध्यक्षा सौ. सविताताई नवले, छ.संभाजीनगर तालुका प्रभारी सौ. राणीताई सोनवणे, सौ.रत्नाताई सोनवणे, सौ.आयोध्या नागवे, सौ.सोनल राजपूत व पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते उपस्थित होते.




हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# शिवचरित्राच्या जागराने श्रोते भारावले

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रातील विविध पैलूंचे वक्त्यांनी घडवलेले मनोज्ञ दर्शन, श्री शिवरायांच्या पराक्रमाची थोरवी गाणारी भाषणे आणि हिंदवी स्वराज्याचे अनन्यसाधारण महत्त्व श्रोत्यांसमोर उलगडत गेले आणि शिवचरित्राच्या या जागराने श्रोतेही भारावले. अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठान आणि कौशिक आश्रम यांनी आयोजित केलेल्या शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे स्मृती व्याख्यानमालेचा समारोप इतिहासाचे अभ्यासक महेश तेंडुलकर यांच्या व्याख्यानाने झाला. शिवचरित्राच्या या जागराला श्रोत्यांची उत्स्फूर्त दाद मिळाली. महर्षी विनोद रिसर्च फाऊंडेशनचे संचालक डॉ. संप्रसाद विनोद आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी शिवचरित्र सर्वदूर पोहोचवण्यासाठी लेखन आणि व्याख्यानांच्या रूपाने जे कार्य केले, त्या कार्याची थोरवी देखील यावेळी मांडण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज सिंहासनाधीश्वर झाले आणि इतिहासाला वेगळे वळण मिळाले. त्यांचे प्रेरणादायी चरित्र सर्वांपर्यंत पोहोचवले पाहिजे, असे वंजारवाडकर म्हणाले. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे कवी होते, लेखक होते, दिग्दर्शक होते, इतिहास संशोधक होते. छत्रपती शिवाजी महाराज यांचे कर्तृत्व त्यांनी विविध माध्यमातून सर्वांपर्यंत पोहोचवले. असे डॉ. विनोद यांनी सांगितले. शिवचरित्र सर्वांना भावेल अशा पद्धतीने मांडणी करत बाबासाहेब पुरंदरे यांनी शिवचरित्राचा प्रसार केला. त्यांचे हे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्यांचे शिवचरित्र मराठी मनावर पकड निर्माण करते. त्यांचे व्यक्तिमत्त्व कला, प्रतिभेसह अनेक गुणांनी संपन्न होते, असे तेंडुलकर म्हणाले. संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त दिवाकर पांडे यांनी प्रास्ताविक आणि नागेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

# अधिसंख्य पदावर वर्ग करा; सहशिक्षिकेची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** येथील सरस्वती विद्या मंदिर येथे चार वर्षे माध्यमिक शिक्षक म्हणून सेवा बजावलेल्या एका महिला शिक्षिकेस जात वैधता प्रमाणपत्र अभावी नोकरीतून काढून टाकण्यात आले.त्यानंतर त्या शिक्षिकेने आधिसंख्य पदावर सामावून घ्यावे अशी मागणी करूनही अद्याप कारवाई न झाल्याने शिक्षणाधिकाऱ्यास निलंबीत करावे, अशी मागणी केली आहे.

राज्यपालास दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, आशाताई संभाजी चेरकेवाड ह्या शहरातील सरस्वती विद्यालयात सहशिक्षिका म्हणुन कार्यरत होत्या. अनुसूचित जमाती या प्रवर्गातून, इयत्ता आठवी वरील विनाअनुदानित तुकडीवर दिनांक २० सप्टेंबर २०१३रोजी सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीवर त्यांना नियुक्ती देण्यात आली होती. जात वैधता प्रमाणपत्र सादर न करू शकल्याने, संस्थेकडून त्यांची सेवा समाप्त करण्यात आली. शासन निर्णय नुसार जात वैधता प्रमाणपत्र अभावी सेवेतून काढून टाकलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवा विषयक व सेवानिवृत्ती विषयक लाभ मंजूर करण्याची तरतूद आहे. यास अनुसरून चेरकेवाड यांनी संस्था व शिक्षणाधिकारी माध्यमिक यांच्याकडे सेवा सातत्य मिळावे यासाठी विनंती केली. परंतू संबंधित संस्था, व शिक्षणाधिकाऱ्यांनी याप्रकरणी उचित लक्ष देत नसल्यामुळें उपासमारीची वेळ आली आहे. आत्महत्या शिवाय पर्याय उरला नसल्याची खंत निवेदनात व्यक्त केली आहे.

**आत्महत्या हाच पर्याय :** मला नोकरी असल्यामुळेच माझा विवाह झाला होता . मला बरेच वर्ष होऊनही वेतन मिळत नाही हे कळल्यावर पतीने मला घराबाहेर काढून टाकले . सध्या कोर्टात हुंडाबळीची केस सुरू आहे .आज मी आई-वडिलांकडे आश्रयास आहे . शाळेवर कुठलेही मानधन व पगार न घेता केवळ आशेवर सतत चार वर्षे सेवा केली त्यानंतर मला संस्थेने काढून टाकले . अनेक विनंती करूनही मला सेवेत पूर्ववत सामावून घेतले नाही त्यामुळे मला आत्महत्ये शिवाय पर्याय उरला नाही म्हणुन शिक्षण विभागाने मला आधिसंख्य पदावर सामावून घ्यावे .
**(आशाताई चेरकेवाड, सहशिक्षिका, सरस्वती विद्यामंदिर, भोकर .)**

# शिरवळच्या ग्लोरी इंग्लिश स्कूल येथे संविधान परीक्षा

## मनोगतातून विद्यार्थ्यांसमोर संविधानाचे विचार मंथन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** भारतीय संविधानाची जागृती सर्वांमध्ये व्हावी. हाच उद्देश ठेवून राज्यभर संविधान गुणगौरव परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.ही परीक्षा रक्षित सामाजिक संस्था म्हसळे अंतर्गत स्थापित संविधान गुणगौरव समितीच्या वतीने नूरखाँ पठाण लिखित "आपले संविधान... राज्यपद्धती नव्हे तर जीवनपध्दती" या पुस्तकावर आधारित घेण्यात आली होती. या परीक्षेसाठी शिरवळ येथील ग्लोरी इंग्लिश मिडीयम स्कूलने सहभाग घेतला होता.एकूण ३५ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी अर्ज भरलेला होता.त्यानुसार स्कूल मध्ये संविधानाची परीक्षा संपन्न करण्यात आली. ही परीक्षा इंग्रजी माध्यमातून एकूण शंभर गुणांची घेण्यात आली.ही परीक्षा स्कूल मध्ये घेण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक जितेंद्र भणगे आणि उपमुख्याध्यापिका वैशाली भणगे यांचे विशेष सहकार्य लाभले. संविधान गुण गौरव समितीचे सदस्य सुशिल गायकवाड यांनी या परीक्षा केंद्राचे केंद्रप्रमुख म्हणून राजेंद्र खुंटे आणि सुजित खुंटे या दोघांकडे जबाबदारी दिली होती. संविधाना प्रति जागृतीचे कार्य करणे हे एक आपले कर्तव्य समजून राजेंद्र खुंटे आणि सुजित खुंटे यांनी ही जबाबदारी अगदी तळमळीने पार पाडली.परीक्षा देण्यासाठी इयत्ता आठवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता.इयत्ता ८ वी तील श्रावणी वीर,सताक्षी मोरे,सृष्टी दडस,वंशिका वीर इयत्ता ९ वी तील ऐश्वर्या तावडे,श्वेता सिंग,जास्मिन शेख,धनश्री वाघ,दक्ष सोनावणे,आयुष वीरकर,सृष्टी



जाधव,किर्ती पुरोहित,उत्कर्ष यादव,अबरार शेख,शिफा खान तसेच इयत्ता १० वी तील आयसु राठोड,समशेर अन्सारी,अनुजा बोबाटे,आफ्रिन तांबोळी,ईश्वरी भोसले,सृष्टी मगर,मंथन कदम,सिध्दी साळुंखे,प्रज्वल देशमुख,तिलोत्तमा जाधव,सिद्धी मांढरे,ओमकार कांबळे,युवराजसिंह राठोड आदी विद्यार्थ्यांनी ही संविधान परीक्षा दिली.संविधान परीक्षेच्या पूर्वी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.तसेच लकी ड्रॉ च्या माध्यमातून पाच विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाची उद्देशिका प्रत देण्यात आली.यावेळी शाळेच्या शिक्षिका सविता कांबळे,परीक्षा केंद्राचे केंद्रप्रमुख राजेंद्र खुंटे आणि सुजित खुंटे यांनी मनोगते व्यक्त केली.संविधानाची का गरज आहे.यावर विशेष प्रकाशझोत सुजित खुंटे यांनी टाकला तर राजेंद्र खुंटे संविधान विषयक ज्ञान आपल्याला का असणे आवश्यक आहे. याबद्दल राजेंद्र खुंटे यांनी माहिती दिली. सविता कांबळे म्हणाल्या की,आपलं संविधान हे आपल्या सर्वांना एकत्रित बांधून ठेवणारं आहे. संविधान हे एक असे पुस्तक आहे.त्यामध्ये आपल्याला नियम सांगितले जात असतात. त्याच नियमाच्या आधारे आपलं शासन आणि प्रशासन चालत असतं.संविधान लिहिण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विशेष प्रयत्न केले. म्हणून त्यांना भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हटले जाते.२६ नोव्हेंबर १९४९ साली आपलं संविधान लिहून पूर्ण झालं.संविधान लिहिण्यासाठी २ वर्षे ११ महिने १८ दिवस लागले.२६ जानेवारी १९५० रोजी ते अंमललात आणलं गेलं.म्हणून संपूर्ण देशात २६ जानेवारी हा दिवस प्रजासत्ताक दिवस म्हणून साजरा केला जातो.

संविधानाने जसे आपल्याला आपले हक्क दिलेले तसेच कर्तव्य सुद्धा दिलेली आहेत. राष्ट्र ध्वज,राष्ट्रगीत आणि सार्वजनिक मालमत्ता यांचे संरक्षण करणे हे सुद्धा आपले कर्तव्य आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी इतर देशांच्या संविधानाचा सुद्धा अभ्यास केला. इतर देशाचे संविधान हे अलिखित स्वरूपाचे आहे. रंतु आपले संविधान हे लिखित स्वरूपाचे आहे. असे सुद्धा सविता कांबळे यांनी म्हटले. ही परीक्षा महत्वपूर्ण तसेच संविधानाचे ज्ञान समजून घेणारी असल्याचे अभिप्राय मिळाले.

या परीक्षेतील सहभागा बद्दल संविधान गुणगौरव समितीचे अध्यक्ष विलास पवार, मार्गदर्शक नूरखाँ पठाण, सदस्य शबनम पठाण, नितीन घोपे, अझहर शहा, नितीन घोपे, दिपरत्न निलंगेकर, युवराज खोब्रागडे, किशोर चव्हाण, सुशिल गायकवाड आदीनी आभार मानत सर्वांचे अभिनंदन केले.

# ओला कापूस ५ हजार, कोरडा ७ हजार रुपये क्विंटलने खरेदी

आधुनिक केसरी न्यूज



**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी महसूल मंडळ मधे अवकाळी पावसाने फटका दिल्याने कापसाचे भाव खालवले आहे.सात हजार शंभर रुपये वरुन कापूस ओला कापूस पाच हजार रुपये तर कोरडा कापूस सहा हजार नऊशे ते सात हजार रुपये प्रतिक्विंटल किरकोळ खरेदी व्यापाऱ्यांनी दि.८ शुक्रवारी आठवडी बाजारात खरेदी केली आहे.व शेतकऱ्यांना पैशाची गरज असल्याने कमी भावातही कापुस विक्री केले.

कापुस वेचणी नंतर सुरुवातीला कापसाला व्यापाऱ्यांनी सात हजार ते सात हजार शंभर रुपये प्रतिक्विंटल प्रमाणे भाव दिला मात्र दि.२६ते३०नोव्होंबर या दरम्यान अवकाळीच्या मुसळधार पावसाने खरिप मधील कापूस पिक व रब्बी पिक हंगामातील गहु हरभरा तुर मका ज्वारी पिकांना मोठा फटका दिला.या पिकांचा पुन्हा दुबारा पेरा करावे लागणारआहे तर वेचणीला आलेल्या कापसाच्या मात्र वाता झाल्या व कापूस ओलाचिंब झाल्याने कापूस खरेदीचे भाव खालवले सात हजार शंभर व दोनशे रुपये भाव ऐवजी आता ओला कापूस पाच हजार रुपये तर कोरडा कापुस सहा हजार नऊशे तर सात हजार रुपये प्रतिक्विंटल प्रमाणे किरकोळ भाव दराने व्यापाऱ्यांनी शुक्रवारी दि.८ आठवडी बाजारात खरेदी केला व शेतकऱ्यांनी ही दिला.कापसाचे भाव खालवल्याने शेतकऱ्यांनी आपला कापुस देने बंद केले आहे.

# कवी लक्ष्मण वाल्डे यांच्या बहुरंगी कवितासंग्रहाचे पिशोर येथे तिफण कविता महोत्सवात प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** त्रैमासिक तिफण, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा कन्नड आणि समता कन्या विद्यालय पिशोर यांच्या संयुक्त विद्यमाने पिशोर येथे ७ जानेवारी रोजी कवयित्री डॉ. वृषाली किन्हाळकर यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कविता महोत्सव संपन्न होत आहे. या कविता महोत्सवात, पिशोरचे भूमिपुत्र नवोदित युवा कवी लक्ष्मण वाल्डे यांच्या बहुरंगी या कविता संग्रहाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. लक्ष्मण वाल्डे यांनी अतिशय प्रतिकुल परिस्थितीत संघर्ष करीत उच्च शिक्षण घेऊन एका फायनान्स कंपनीमध्ये नोकरी करीत आहेत. नोकरी सांभाळून त्यांनी काव्य लेखनाचा छंद जोपासला. तिफण कविता महोत्सवाचे व्यासपीठ व मार्गदर्शन मिळाले. विविध विषयावर सातत्याने लेखन करणारे ते कवी आहेत. वर्तमानपत्रे व दिवाळी अंकातून त्यांच्या कविता प्रसिद्ध झालेल्या आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानातून त्यांना कविता संग्रह येत आहे. या कविता महोत्सवात सहभागी व्हावे असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# उद्यमशील तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता स्वतःच्या उद्योग उभारणीवर भर द्यावा

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** आज संगणकीय युगात नौकरी मिळणे जवळपास दुरापास्त झालेले आहे, ज्यांनी तांत्रिक व कौशल्य पूर्ण ज्ञान व पात्रता प्राप्त केली आहे. अशा उद्यमशील तरुणांनी नौकरी मिळण्याची वाट न पाहता स्वतः च्या ज्ञान,कौशल्य, माहिती व कर्तृत्वाने आपला उद्योग व्यवसाय आरंभ करून स्वावलंबी बनावे असे प्रतिपादन वैजापूर-गंगापूर चे आमदार प्रा,रमेश पा, बोरनारे यांनी केले. ते ग्लोबल व्हील केअर या संगणकीय ३-डी व्हील अलाईनमेंट या फर्म चे उदघाटन करतांना बोलत होते,कलीम शेख नावाच्या एका उच्च शिक्षित तरुणाने हा उद्योग आरंभ केला,या प्रसंगी प्रमुख उपस्थिती डॉ,दिनेश परदेशी यांनी प्रतिपादन केले की,वैजापूर शहर हे झपाट्याने विकसित होत आहे,समृद्धी महामार्ग,नागपूर -मुंबई महामार्ग व निर्मल-नासिक-मुंबई हा राष्ट्रीय महामार्ग शहरातून जात असल्याने उद्योग व्यवसायाला खूप वाव आहे,अध्यक्षस्थानी वैजापूरच्या मावळत्या अध्यक्षा शिल्पाताई परदेशी होत्या. वैजापूर शहरात प्रथमच कॉम्प्युटर द्वारे चार चाकी वाहन दुरुस्ती ही फर्म आहे,आपल्या प्रास्ताविकात सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी या फर्म च्या कामाची पूर्ण माहिती उपस्थिताना दिली व सूत्र संचलन केले. साबेर पठाण, व कलिम लतीफ शेख यांनी उपस्थितांचे स्वागत केले. या प्रसंगी माजी आ. भाऊसाहेब पा,चिकटगावकर, शिवसेना उप जिल्हाप्रमुख प्रमुख बाबासाहेब जगताप, शिवसेना तालुका प्रमुख राजेंद्र पा, साळुंके, शहर प्रमुख पारस घाटे भाजपा शहर अध्यक्ष दिनेश राजपूत, उपनगराध्यक्ष साबेरखान, मजीद कुरेशी, गुजराथ येथून आलेले हाजी शेख रहीम, राज महमंद शेख, सरपंच दौलत गायकवाड,हमीद शेख, संजय बोरनारे, अमोल बोरनारे, श्री नाईकवाडी, भरत कदम यांची उपस्थिती होती.

# जागर स्त्री शक्तीचा : स्त्रीशक्तीच भारतमातेचे स्वरूप याचे भान जागवूया

## श्रीमती चंद्रिका भाभी चौहान : उद्घाटनसत्रात खा. डॉ. प्रीतमताई मुंडे यांची प्रमुख उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज



**बीड :** भारत देश म्हणजे जिल्हा, राज्य किंवा भूभाग जमिनीचा तुकडा नव्हे तर मातेच्या स्वरूपात पहात असू तर स्त्री शक्ती म्हणजे आपणच भारतमाता आहोत हा विचार मनात ठेवून, आपल्या मुलाबाबत जो विचार, जी स्वप्न, जे काम करतो त्यात विचारांचा जागर करण्यासाठीचे हे संमेलन आहे.

गर्भ संस्कारात जे चिंतन होते तसेच मुल घडत असते, आपलं मुल एक चांगला माणूस, देशाचा चांगला नागरिक घडवण्यासाठी आपण आहोत, हे चिंतन आपल्या संस्कृतीचे जतन, पुनरावृत्ती करण्यासाठीचा जागर करूया, ही माहेरची शिदोरी समजून सर्वां पर्यंत पोहोचू या अशा शब्दात स्वत्व जाणीव, कर्तव्य आणि जबाबदारीचा जागर सेवाभारतीच्या राष्ट्रीय सचिव चंद्रिकाभाभी चौव्हाण यांनी आपल्या मार्गदर्शन भाषणातून मांडला.

या उद्घाटन सत्रात बीड लोकसभेच्या खा.डॉ. प्रीतमताई मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रीतम ताईंनी मोदीजींच्या सरकारमध्ये महिला सक्षमीकरणा झालेल्या कार्याबद्दलची माहिती देत ,महिला योगदानाबद्दल चे कौतुक आणि महिलांचे योगदान वाढवणारे कृती कार्यक्रम होत असल्याचे सांगितले. विविध कार्यक्रमातून महिलांची नाममात्र उपस्थिती असते, पदावर असून देखील सूत्र काही वेळा पुरुष मंडळी चालवतात, असे न होता महीलानी सक्षमपणे पुढं आलं पाहिजे , शांत, संयमी आणि सक्षम महिला एकत्र एका ध्येयाने येऊ शकतात याचं उत्तम उदाहरण इथे दिसून येत आहे. आयोजना बद्दलचे कौतुक खा.मुंडेनी केले.

मी खूप भोगले आहे, सोसले आहे, आम्हाला काहीच किंमत नाही, आम्हाला कोणी विचारत नाही ही विचार करण्याची पद्धत बदलली पाहिजे. खरं म्हणजे घरात स्त्रीच चालतं तर ते चांगलं चाललं पाहिजे याची जबाबदारी स्त्रीचीच असते .हसण्यासाठी क्लब आणि झोपेसाठी गोळीची गरज पडणार नाही, आपल्याला जे जमतं त्याचा विकास करून संघटन शक्तीसी जोडून घेतलं पाहिजे. आपल्याकडील चांगलं ते आपण विसरतो आणि पाश्चिमा त्याचे अनुकरण करत जातो, आपल्या संस्कृतीत, भारत मातेचे वैविध्य खूप चांगलं आहे त्याचे अनुकरण करूया, त्यासाठी खारुताई सारखे जेवढं जमेल तेवढं करूया,घरातील लहान मुलांना देखील सर्व समजते त्याच्या समोरचा व्यवहार आणि संवाद चांगला ठेवला पाहिजे. स्वदेशीचा वापर, कुटुंबाचे प्रबोधन, जशी केरिंग करतो तशी मुलांना शेअरिंग शिकवली पाहिजे. आपली पुरुष किंवा स्त्रीप्रधान नव्हे तर धर्मप्रधान संस्कृती आहे. अशा सोप्या भाषेत, खेळातुन चंद्रिकाभाभीनी केलेला स्त्रीशक्तीचा जागर सर्वांच्या मनाला भेदून जात होता.

उद्घाटनसत्रा पूर्वी सांस्कृतिक कार्यक्रमातून इंजी. वैष्णवी चे नृत्य तर माजलगावच्या महिला मैत्रिणींनी सादर केलेले 'मला दादाला नको ग बाई" हे नाथाचे भारुड यातून प्रबोधन सअभिनय सर्वांना खूप भावला.

महिलांची संख्या ५०% आहे, सर्वच क्षेत्रात त्या आघाडीवर आहेत, कुटुंबात स्त्रीची भूमिका महत्त्वाची असते. भारत विश्व गुरु होत असताना मला काय त्याचे? ही भूमिका न ठेवता प्रतिक्रिया आणि प्रतिसाद महिलांचा देखील वाढला पाहिजे, समस्यावर चर्चा स्त्रीशक्तीचा जागर का व कशासाठी या प्रश्नाचे उत्तर मिळविण्यासाठी या महिला संमेलनाचे आयोजन असल्याचे प्रास्ताविकातून डॉ सीमाताई जोशी यांनी सांगितले. संमेलन प्रमुख डॉ शांताताई गीते यांनी सर्वांच्या श्रद्धेचा विषय प्रभू रामाच्या मंदिर संघर्षाच्या इतिहास आठवण करून देत अयोध्येत होत असलेला राम जन्मभूमी येथील भव्य मंदिराच्या निमित्ताने सर्वत्र उत्सव साजरा करूया असे आवाहन केले. यावेळी नभाताई वालवडकर, जयश्रीताई नेलवाडकर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

स्त्रीजर लक्ष्मीचे रूप आहे तर घरात येणारा पैसा हा भ्रष्टाचाराच्या मार्गाने तर येत नाही ना ? हे बघितले गेले पाहिजे. सरस्वतीच्या रूपात आपण आहोत तर आजूबाजूचे सर्व सुशिक्षित होत आहेत ना ? मुली शिक्षणापासून वंचित तर नाहीत ना? हे पाहिलं गेलं पाहिजे. काली मातेच्या रूपात आपण मुलीशी आणि सुनाक्षी वागणं बरोबरीचे आहे का ,? आई आणि सासू सोबतची वर्तणूक सारखी ठेवतो का ?अशी सर्व प्रश्न आहेत आणि त्यांच्याकडे त्याचे उत्तरही आहेत. सर्वांनाच सन्मार्गी आणण्याचे काम शक्तीस्वरूप स्त्रीचेच आहे, असे प्रबोधनपर भाष्य प्रसिद्ध लेखिका विनिता ताई तेलंग यांनी स्त्री शक्तीचा जागर या राष्ट्रसंवर्धन संस्थेसोबत विविध महिलांचे एकत्रीकरण संमेलन प्रसंगी केले. याप्रसंगी बीडच्या जिल्हाधिकारी दीपाताई मुधोळ मुंडे यांचे प्रमुख उपस्थिती होती.

भारताच्या विकासात महिलांचे योगदान, या विषयावर बोलताना तेलंग पुढे म्हणाल्या की भारत देश विश्वगुरू होत असताना अशक्य काही नाही पण घोडे अडते आहे, तर संख्येने 50% असलेली स्त्रीशक्ती सर्व क्षेत्रात आघाडीवर आहे असे आपण बोलतो पण सहभाग मात्र 50 टक्के एवढा नाही. जगाच्या पाठीवर कुटुंब व्यवस्थेमुळे आपण खंबीर आहोत पण कुटुंबातील समस्या आहेत, ज्या पुरुषाबद्दल तक्रारी आपण करतो त्यांना आपण कधी ठणकावतो का, दुटप्पी पणा न ठेवता संतुलन ठेवण्यासाठी ची गरज आहे, बाईपण हे पाण्यासारखे असते, ते थांबून राहत नाही वाट शोधत असते. आपापसात बोलूया मुलींना पिढीला समजून घेऊन प्रश्न सोडवता येतील असेही मनोगत तेलंग ताईंनी यावेळी व्यक्त केले. जिल्हाधिकारी दीपाताई मुधोळ- मुंडे यांनी शासनाच्या खूप मोठ्या योजना सर्वांसाठीच असतात, त्यात महिला वर्ग त्या किती समजून घेतात त्यांचा लाभ घेतात याकडे लक्ष वेधले. घर प्रपंच करताना देश कार्यास देखील सहभागी होता आलं पाहिजे असेही आवाहन त्यांनी याप्रसंगी केले ,प्रतिभा शिंदे यांचे आभार प्रदर्शन आणि संपूर्ण वंदे मातरम ने या रामकृष्ण लॉन्स येथेभव्य महिला संमेलनाचा समारोप झाला.

# पडळकर यांच्यावर चप्पल फेक करणाऱ्यास अटक करा

आधुनिक केसरी न्यूज



**भोकर :** ओबीसी नेते आमदार गोपीचंद पडळकर यांच्यावर चप्पल फेक करून मराठा व ओबीसी समाजात तेढ निर्माण करणाऱ्या समाज कंटकावर त्वरित कारवाई करून अटक करण्याची मागणी सोमवारी (ता.११) तालुका ओबीसी समाज बांधवाकडून करण्यात आली आहे.

मुख्यमंत्र्यांकडे देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे नमूद केले आहे की, ओबीसी नेते पडळकर यांना काही समाजकंटकांनी अर्वाचे भाषेत शिवीगाळ करून चप्पल फेक करून त्यांच्यावर भ्याड हल्ला केला आहे. तसेच मराठा आणि ओबीसी समाजात तेढ निर्माण करण्यासाठी सोशल मीडियावर व अन्य माध्यमातून धमक्या आणि चीतावणीखोर वक्तव्ये करण्यात येत आहेत. तेव्हा शासनाने चीतावणीखोर समाजकंटकांचा शोध घेऊन त्यांच्यावर तात्काळ कठोर कार्यवाही करून अटक करावी. अन्यथा सकल ओबीसी समाज मोर्चे व आंदोलने करून रस्त्यावर उतरेल याची शासनाने नोंद घ्यावी असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

या निवेदनावर सकल ओबीसी नेते नामदेवराव आयलवाड, मोहनराव राठोड, ॲड.शेखर कुंठे, सुरेश बिल्लेवाड, बालाजी शानमवाड,गणेश राठोड, रामचंद्र येईलवाड,विशाल दंडवे, बि.आर. पांचाळ, सुनील मदनवाड, ॲड.प्रदीप राठोड, जगन पाटील बुट्टनवाड, नंदकुमार कोसबतवार, पांडुरंग वर्षेवार, आदिनाथ चिंताकुटे आदींसह अनेक ओबीसी नेते व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# भोकरला श्रामनेर शिबिराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** भारतीय बौध्द महासभा शाखा भोकर व महात्मा फुले नगर यांच्या संयुक्त विद्यमाने दहा दिवसीय श्रामनेर बौध्दाचार्य प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

शहरातील महात्मा फुले नगर वसाहतीतील लूबींनी बूध्दविहार परिसरात शूक्रवारी (ता.१५) ते रविवारी (ता. २४) दरम्यान संघनायक पुज्यभन्ते बी.संघपाल महाथेरो, भारतीय बौद्ध महासभा भिख्खू संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष पुज्यभन्ते बोधीधम्मो यांच्या मार्गदर्शनाखाली दहा दिवसीय श्रामनेर बौध्दाचार्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.यावेळी विलास सवई अकोला याचे मार्गदर्शन लाभणार आहे.पंचक्रोसीतील ऊपासकानी सहभाग घेऊन आपल जीवन सदाचीरी व शूध्द बनवावे असे अहवान बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष बाबुराव सोनकांबळे हाडोळीकर,प्रसाद शहाणे, साहेबराव मोरे,रवीकुमार महाबळे,राजु दांडगे, भीमराव दूधारे यांनी केले आहे.


गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर